बाल्टिमोर मराठी मंडळ

जें खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो |
भूतां परस्परे पडो |

# मैत्र

जीवाचें ||



## २०२१ अंक ४

**मैत्र संपादक मंडळ २०२१**

वरदा वैद्य
विदुला कोल्हटकर
रोहित कोल्हटकर
कपिल धाकड
मधुर पुरोहित

**बाममं कार्यकारिणी २०२१**

**अध्यक्ष**
रोहित कोल्हटकर
**उपाध्यक्ष**
ऋद्धी आठवले वाडदेकर
**उपाध्यक्ष– विपणन**
समीर अहिरराव पाटील
**चिटणीस**
मधुर पुरोहित
**खजिनदार**
केतन बर्डे
**सह–खजिनदार**
रवीशेखर महाजन


## संपादकीय

नमस्कार मंडळी,

आली दिवाळी मंगलदायी, आनंद झाला घरोघरी!

गणपती, नवरात्र संपले आणि दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. दिवाळीच्या काही दिवस आधीच मैत्रचा २०२१ वर्षातला शेवटचा अंक रसिक वाचकांच्या हातात ठेवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. मागील वर्षाच्या खंडानंतर ह्यावर्षी बाल्टिमोर मराठी मंडळाने मर्यादित स्वरूपात गणपती उत्सव साजरा केला, तेव्हा तुम्ही उपस्थिती लावली असेल. गणपती उत्सवाचे निवडक फोटो संपादकीयाच्या शेवटी जोडले आहेत. दिवाळीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाची तिकीटे तुम्ही खरेदी केली असतीलच. सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

ह्या अंकासाठी लेखन पाठवलेल्या सर्वांचे अनेक आभार. ह्यापुढील अंकासाठीही तुम्ही लेखन पाठवत राहाल अशी आशा करतो. ह्या अंकामध्ये अनेक स्थानिकांनी पहिल्यांदाच मैत्रासाठी लेखन पाठवले आहे. त्यातून इतरांना प्रेरणा मिळून अधिकाधिक लोक लेखन करण्यासाठी उद्युक्त व्हावेत अशी आशा बाळगतो.

लेख, अनुभव, कथा, कविता अशी साहित्यिक रेलचेल ह्या अंकात आहे. पाककृतीच्या सदरांतर्गत गणपती-नवरात्रात नैवेद्यासाठी केलेल्या पाककृतींच्या आवाहनाला प्रतिसाद देणारे 'मनातला गणपती' आणि 'उकडीचे मोदक' हे लेखही ह्या अंकात वाचा. मराठी कला मंडळाचे 'हितगुज' आणि आपल्या 'मैत्र'दरम्यान साहित्यिक देवाणघेवाणीची परंपरा आहे. मैत्रच्या ह्या अंकामध्ये सुनील खाडिलकर ह्यांनी हितगुज मासिकाच्या होळी अंकातला एक विनोदी लेख पुनर्प्रकाशित करत आहोत.

भारतीय सणांसोबत आपण इथले सणही साजरे करत असतो. थॅन्कगिव्हिंग, ख्रिसमस आणि नवीन वर्षाचे स्वागत तुम्ही कसे करता? त्यावेळी भारतीय पद्धतीचे पदार्थ करता की अमेरिकी/पाश्चात्य पदार्थ करता? थॅन्कगिव्हिंग आणि ख्रिसमससाठी तुम्ही करत असलेलया पदार्थांच्या अनोख्या पाककृती, त्या करतानाच्या आठवणी आणि अर्थातच त्यांचे फोटो आम्हाला जरूर पाठवा. पदार्थ खास होण्यासाठीचे तुमचे नुस्खेही लिहायला विसरू नका. तुम्ही एखादी कला जोपासत असाल तर कलाकार ओळख सदरांतर्गत तुमची माहिती आम्हाला पाठवा. येत्या हिवाळी सुट्ट्यांमध्ये प्रवासाचे बेत तुम्ही आखले असतील तर तुमचे प्रवासवर्णन आम्हाला लिहून पाठवा. शिवाय नेहमीप्रमाणे कथा, कविता, अनुभव, लेख आणि चित्रांचेही स्वागत आहेच. पुढील अंकासाठीचे साहित्य १५ जानेवारीपर्यंत editor@baltimoremarathimandal.org ह्या पत्त्यावर पाठवा.

ऑगस्टमध्ये शाळा सुरू झाल्या आणि त्या अजूनही चालू आहेत. अनेक मुले सुमारे दीड वर्षांच्या ऑनलाईन शिक्षणाच्या अनुभवानंतर शाळेत प्रत्यक्ष जाऊ लागली आहेत, मित्र-मैत्रिणींना, शिक्षक-शिक्षिकांना प्रत्यक्ष भेटत आहेत. आपल्यापैकी अनेक पुन्हा ऑफिसात जाऊ लागले असतील, कार्यालयीन सहकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटले असतील. मुलांचा, तुमचा शाळा-ऑफिसच्या पुनर्भेटीचा अनुभव कसा होता ते आम्हाला नक्की लिहून कळवा.

# बाल्टिमोर मराठी मंडळ
# मैत्र

येणारी दिवाळी आणि नवे वर्ष सर्वांना आरोग्यपूर्ण, सुखसमृद्धीचे आणि समाधानाचे जावो ह्या सदिच्छा !

कळावे,
संपादक मंडळ

## ह्या अंकात –


**लेख**
- आमचे विठ्ठल मंदिर –शर्मिली सिन्नरकर–कुलकर्णी
- ग्राम–गाव – श्रीया दीक्षित–नाचरे
- मला आवडलेली मिरासदारी – संजीव कुलकर्णी
- जरा विसावू या वळणावर (भाग१) – जयश्री कुलकर्णी–खेरा
- भेटी लागी जीवा – दीपा नातू
- माझे व्हीगन प्रयोग – मुग्धा मुळे
- चूल वर पिझ्झा – सुनील खाडिलकर


**कथा**
- प्रभा – विदुला कोल्हटकर
- देस–परदेस – बाळकृष्ण पाडळकर

**कविता**
- एक अगम्य लालसा आणि पाच डॉलर्स – मिलिंद पदकी

**पाककृती**
- मनातला गणपती – भाग्यश्री साने
- उकडीचे मोदक – सविता शिंदे

**कला**
- गणपती बाप्पा – अथर्व बेंगेरी


## २०२१ बाममं गणपती उत्सव







# बाल्टिमोर मराठी मंडळ
# मैत्र







**For Special Benefit of Baltimore Marathi Mandal Members**


Notary and Realtor Services Provided (with UPS Store #6852 in Wintergreen Plaza) at convenient locations: Columbia, Rockville and Burtonsville, MD.

All services are provided with proceeds donated to Baltimore Marathi Mandal. Our services include a number of functions that our members need with reference to Indian functions, such Power of Attorney documents, Apostille services, etc. Contact at above locations with E-mail and/or Phone to check the convenient time.

**Gajanan M. Sabnis**
10001 Windstream Drive
Columbia, MD 21044
TEL: 240 988 6050
E-mail: gmsabnis@gmail.com

**Mahadeo Wayal**
14713 Harvest Lane
Silver Spring, MD 20905
Tel: 240 706 1488
E-mail: mwayal@gmail.com

# आमचे विठ्ठल मंदिर



शर्मिली सिन्नरकर–कुलकर्णी

उठा पांडुरंगा आता दर्शन द्या सकळा |
झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा ||
या माझ्या आजी, आई आणि दोन्ही काकूंच्या सुमधुर आवाजाने माझ्यावर संस्कार होतच मी लहानाची मोठी झाले, याला कारण माझ्या माहेरचे (आमचे) नारायण पेठ, पुणे येथील खाजगी विठ्ठल मंदिर. ह्या विठ्ठल मंदिरातील माझ्या आई-वडिलांची ७वी पिढी.

आमचे पूर्वज वारकरी होते. न चुकता ते पंढरीची वारी करायचे. साधारणतः १७९३-९४ च्या आसपास आमच्या पूर्वजांपैकी एक ९० वर्षांचे झाल्यावर मात्र त्यांनी पंढरीच्या पांडुरंगाला, 'नको देवराया अंत आता पाहू!' अशी कळकळीची विनंती केली. म्हणाले, आता माझ्याच्याने वारी होणार नाही ही शेवटची वारी मी आता थकलो. तेव्हा पंढरीनाथाने स्वप्नात दृष्टांत देऊन सांगितले, उद्या सकाळी पुंडलिकाच्या डोहात तू स्नानाला जाशील तेव्हा मी तुला भेटेन. त्या प्रमाणे सकाळी त्यांनी डोहात पहिली डुबकी मारताच रुख्मिणी माता हाताशी आली व दुसऱ्या डुबकीमध्ये पांडुरंगाची मूर्ती मिळाली. त्यावेळी 'आनंदाचे डोही, आनंद तरंग!' अशी त्यांची अवस्था झाली. आषाढी एकादशी ते पौर्णिमा पंढरपुरात राहून त्यांनी मूर्तीची षोडशोपचारे पूजा केली आणि नंतर त्याच परमानंदात हत्तीवरून, वाजत गाजत त्यांनी दोन्ही मूर्ती पंढरपूरहून पुण्यात आणल्या. नंतर १७९४ साली एकादशीला आज जेथे आहेत तेथे मूर्तींची प्रतिष्ठापना केली. तेव्हापासून आमच्या मंदिरात पंढरपूरसारखा आषाढी एकादशी ते गुरुपौर्णिमा असा पाच दिवसांचा उत्सव सुरु झाला.



श्री प्रफुल्ल गोळे मामा ह्यांनी 2019 मध्ये काढलेले आमच्या विठ्ठल मंदिर परिसराचे रेखाचित्र

आषाढी एकादशीला आमच्या रुख्मिणी-पांडुरंगाला षोडशोपचारे अभिषेक केला जातो. माझे बाबा श्री. दिनानाथ मोठ्या आवडीने व प्रेमाने रुख्मिणी पांडुरंगाचा साजशृंगार करतात. त्या दिवसापासून सायंकाळी मंदिरात कीर्तन सुरु होते व नाम गजरात मंदिर दुमदुमून जाते. काल्याचे कीर्तन गुरुपौर्णिमेला असते. ते झाल्यावर 'राधा-कृष्ण गोपालकृष्ण'च्या गजरात देवाला लोणी साखर भरवली जाते. त्याच गजरात सर्वजण गंगापूजन म्हणजेच नदीवर पूजनाला जातात व येताना सर्वांना प्रसाद

वाटप करत येतात. नंतर दहीहंडी फोडली जाते व दहीकाल्याचा प्रसाद सर्वांना दिला जातो. कीर्तन झाले की मंत्रजागर व भजन होते. ते पहाटेपर्यंत चालते.

या उत्सवाच्या दरम्यान विठ्ठल-रुख्मिणीच्या मूर्तींचे तेज अलौकिक असते, म्हणून सर्व कार्यक्रम झाल्यावर त्यांची दृष्ट काढली जाते.
पंढरीच्या राया तुला दृष्ट जाहली |
ओवाळीते तुला रे देवा संतमंडळी, देवा भक्तमंडळी ||

१९६१ साली पुण्यात पानशेत धरण फुटून जो प्रलय झाला त्यावेळी आमच्या राहत्या जागेतील सर्व संसार वाहून गेला. माझे बाबा तेव्हा खूप लहान होते. आजोबा व काकांनी छातीएवढ्या पाण्यातून चालत जाऊन आमच्या गायींना मोकळे सोडले. डोळ्यांदेखत पिढ्यानपिढ्यांची सोने-चांदी, सर्व संसार वाहून जाताना पाहून आजीने पांडुरंगाला विनवले 'तुजविण नाही दुजा आधार!' त्याच पंढरीरायाच्या कृपेने गाभारा व मूर्ती मात्र तसूभरही हलल्या नाहीत. इतकंच काय पण जेव्हा पुराचे पाणी ओसरले तेव्हा सगळीकडे चिखल होता पण गाभारा स्वच्छ होता. दोन्ही मूर्ती, रुख्मिणीचा पोहे हार, कुंकू सर्व कोरडे होते. पुरानंतर केवळ ८ दिवसांत उत्सव होता, तरी सुद्धा पंढरीरायाने विटा-बाजा टाकवून कीर्तन करवून घेतले. त्या वेळचे कीर्तनकार ह. भ. प. श्री जुन्नरकरबुवा यांनी बिदागी न घेता कीर्तन केले. अशा अनेक अडचणीत सुद्धा 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती!' ही उक्ती यथार्थ करत पंढरीनाथाने सिन्नरकरवाडा पुन्हा दिमाखात उभा केला.


मंदिराचे बाहेरून घेतलेले छायाचित्र

कोजागरी पौर्णिमा ते कार्तिकी पौर्णिमा अशी महिनाभर काकडआरती चालते. ती मजा काही औरच. रोज देवाला पंचामृताने स्नान, नवनवीन कपडे, हार-तुरे, निरनिराळ्या रांगोळ्या, सुमधुर आवाजातील पहाटेची गाणी, निरनिराळ्या पक्वान्नांचे जेवण, विडा, आरसा, चौरी, वेगवेगळे गंध अशाप्रकारचा साजशृंगार केला जातो. शेवटच्या दिवशी, कार्तिकी पौर्णिमेला, अन्नकोट साजरा होतो. त्यावेळी नारायण पेठेतील आजूबाजूच्या स्त्रिया पांडुरंगासाठी वेगवेगळे पदार्थ आणून देतात आणि आरती होऊन काकडा समाप्ती होते.

असा हा उपक्रम माझे थोरले काका श्री. द्वारकानाथ मोठ्या जबाबदारीने पार पाडत. माझे बाबा व काका त्यांना सर्व प्रकारे सहकार्य करत. आता ही जबाबदारी माझा चुलतभाऊ श्री. धनंजय मोठ्या उत्साहाने पार पाडतो. माझे मधले काका श्री. विजयकुमार ह्यांनी वारीचा वारसा पुढे चालवला, पण आता वयोमानाप्रमाणे त्यांना जमत नाही. तरी त्यांचा मुलगा श्री. विश्वास ही वारी जमेल तशी करतो.

अशा प्रकारे २२७ वर्षे झाली आणि आता आमची ८वी पिढी - श्री. धनंजय व श्री. विश्वास हे कार्य अविरत करत आहेत. तो पंढरीनाथ स्वतः हे सर्व कौतुकाने करवून घेत आहे, असे म्हणणे जास्त यथार्थ ठरेल. म्हणून म्हणावेसे वाटते,
सुदिन हा आज पातला, मंदिरी आमुच्या मोह दाटला |
मंगल तोरण दारी बांधुनी, पानाफुलांची नक्षी काढुनी, सुसज्य केले प्रांगण सजवुनी ||
स्वागत करण्या पंढरीनाथा, सानथोर हे मनापासूनी |
आनंदाने मोहित होऊनी, नाती जपती एक होऊनी ||
एक दिलाने, एक मनाने, वसा घेतल्या आठव्या पिढीने|
वळणावरती अनेक वळणे आली आयुष्यात, तरीही सिन्नरकरांचे विठ्ठल मंदिर उभे दिमाखात ||

मंदिराबाहेरचे एक वैशिष्ट्य म्हणजे ३०० वर्षांपूर्वीचे पिंपळाचे झाड व त्याच्या खाली दक्षिणमुखी मारुतीराया उभे आहेत. त्यांची माहिती पुन्हा कधीतरी.





# बाल्टिमोर मराठी मंडळ
# मैत्र





**श्रीया दीक्षित–नाचरे**
पुण्यात वास्तव्य. M.A. Indology ( प्राचीन भारतीय विद्या )
मोडी लिपी – वाचक, अभ्यासक आणि शिक्षिका


## ग्राम – गाव

ग्राम म्हणजे गाव. ग्राम हा संस्कृत शब्द आहे. वैदिक काळातील ग्राम या शब्दाचा अर्थ 'काही काळ वास्तव्याचे ठिकाण' असा आहे. म्हणजे ग्राम या शब्दाचा अर्थ आपण आज ज्याअर्थाने गाव हा शब्द वापरतो त्यापेक्षा खूपच वेगळा आहे असं दिसतं.
आज गाव म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर काय येतं? तर थोडी वस्ती आणि त्याभोवती शेती असं दृष्य. गावाचे दोन भाग असतात. पांढरी आणि काळी. पांढरी म्हणजे वस्तीचा भाग आणि काळी म्हणजे शेत जमीन. गाव म्हणजे; ज्या वस्ती भोवती शेतीयोग्य अशी भरपूर जमीन आणि शेती करणारे शेतकरी तसेच कुशल मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध असते असे ठिकाण. पांढरी आणि काळी या भागांमुळे त्यावर आकरल्या जाणार्या पट्ट्यांची नावंही तशीच पडली. 'मी अमुक इतकी पांढरी दिली, अमुक इतकी काळी दिली', असे उल्लेख कागदपत्रात लिहिलेले दिसतात.

शेतीसंदर्भात आणखी एक संज्ञा वापरली जाते. ती म्हणजे 'शिवार'. पण शिवार म्हणजे फक्त शेत असा नसून शिवार म्हणजे गावाच्या वस्तीचा भाग सोडून शिवेच्या आतील (हद्दीतील) सर्व जमीन. यामधे शेतं, चराईची कुरणं, बखळी, नद्या, नाले, मसणवाटा, माळरानं, मुरमाड जागा इ. सर्वांचा समावेश होतो.

अनेक मोडी कागदपत्रांत गावाला 'देह' असेही म्हटलेले दिसते.


गावासाठी आणखी एक शब्द वापरला जातो. तो म्हणजे खेडं. मग याचा अर्थ काय ? याचं स्पष्टीकरण असं देता येतं की, 'खेडणे' या शब्दाचा अर्थ जमीन कसणे असा आहे. त्यामुळे अर्थातच 'खेडू ' म्हणजे जमीन कसणारा होय. या खेडूंची संख्या जेथे जास्त ते खेडे होय (संस्कृत मधे 'खर ' हा धातू खरवडणे किंवा कोरणे यासाठी वापरला जातो हे इथे लक्षात ठेवले पाहिजे). आज आपण खेडू या शब्दाला 'त ' हा प्रत्यय लावून खेडूत हा शब्द फार वेगळ्या आणि चुकीच्या अर्थीही म्हणजे गावंढळ या अर्थीही वापरतो. ते योग्य नाही.

कधी कधी वस्तीपासून शेत दूरच्या अंतरावर असल्यामुळे शेतकऱ्यांना किंवा मजुरांना शेतावर रहाण्याची गरज पडत असे. त्यामुळे शेतावर घरे अथवा झोपड्या बांधाव्या लागत असत. अश्या दोन-चार घरे अथवा झोपड्या असलेल्या वस्तीला झाप/ आवसा/ गोठा/ पडळ इ. नावं आहेत. या वस्त्यांमध्ये वाढ होऊन २०-२५ घरं झाली की अश्या वस्त्यांना वाडी/ मजरे/ वाडा/ पाडा इ . नावांनी संबोधले जाते. हे आवसे, मजरे, पडळी, वाड्या गावाच्या अंतर्भूत वस्त्या असतात. 'अमुक गावाची ही वाडी', असे म्हटले जाते.

गावाची वस्ती वाढली आणि गावात उद्योगधंदे वाढले, हुन्नरी/कसबी लोकांची संख्या वाढली की अश्या गावाला शहर म्हटले जाते. थोडक्यात गावातील काळीपेक्षा पांढरी वाढली म्हणजे गावाचे शहर होते. शहरात/ गावात 'कसबा ' हा भाग आवर्जून असतो. कसबा म्हणजे जुनी वस्ती किंवा ~~ज्या भागात~~ कसबी/ हुन्नरी लोकांची वस्ती असलेला भाग होय. तसेच शहरात किंवा गावात जेथे बाजार किंवा दुकानं असतात अश्या भागाला पेठ असं म्हणतात.

संदर्भ : गावगाडा - लेखक : त्रिंबक नारायण अत्रे

# मला आवडलेली मिरासदारी



**संजीव कुलकर्णी**

संजीव कुलकर्णी पुण्याचे रहिवासी आहेत. त्यांनी सूक्ष्मजीवशास्त्रात एम एससी , मास्टर्स इन मार्केटिंग मॅनेजमेंट, व मार्केटिंग विषयात पीएचडी केलेले असून ते बिझनेस मॅनेजमेंट विषयाचे प्राध्यापक आहेत. सध्या मराठी विषय घेऊन पीएचडी करत आहेत. त्यांची अनुदिनी इथे वाचता येईल – www.sanjopraav.wordpress.com संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक +९१ ९८२३१७९५९७.

सदर लेख त्यांच्या अनुदिनीवर पूर्वी प्रकाशित झाला होता. प्रसिद्ध लेखक द. मा. मिरासदार ह्यांचे २ ऑक्टोबर २०२१ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून हा लेख इथे पुनर्प्रकाशित करत आहोत.

द. मा. मिरासदार हे मराठीतले आघाडीचे विनोदी लेखक. लोकप्रियता हा यशस्वी होण्याचा निकष लावायचा झाला तर अगदी यशस्वी लेखक. पण लोकप्रियता आणि दर्जा यांचे काही म्हणजे काही नाते नाही. मिरासदारांचा विनोद टाळ्या खूप घेतो, पण तो 'टंग इन चीक'च्या मर्यादा क्वचितच ओलांडतो. बऱ्याच वेळा मिरासदारांचे लिखाण हे शाळकरी मुलांनी शाळकरी मुलांसाठी केलेले, बाळबोध वाटते. शारीरिक व्यंगे, हाणामारी, आळशीपणा, झोप अशा विषयांवरील मिरासदारांचा विनोद प्राथमिक अवस्थेत अडकून राहिल्यासारखा वाटतो. मिरासदारांच्या कथांमधील व्यक्ती गमतीदार, तऱ्हेवाईक आणि विविधरंगी असल्या तरी त्या कचकड्याच्या वाटतात. भोकरवाडी आणि तिथले ग्रामस्थ यांच्याविषयीच्या मिरासदारांच्या कथा वाचताना क्वचित हसू येते, पण दीर्घकाळ स्मरणात राहाणारा आणि केवळ स्मरणानेही आनंद देणारा विनोद मिरासदारांच्या हातून क्वचितच लिहिला गेला आहे.

अर्थात वरील नकारात्मक विधाने ही मिरासदारांच्या सर्वच लिखाणाला लागू नाहीत. मिरासदारांचे बरेचसे विनोदी लेखन (मला) कमअस्सल वाटत असले तरी मिरासदारांनी काही अगदी जिवंत, खरोखर गंमत आणणाऱ्या आणि त्याहून महत्वाचे म्हणजे गंभीर आणि हृदयस्पर्शी अशा कथा लिहिल्या आहेत. एक लेखक म्हणून आवश्यक असणारे सगळे गुण – उत्तम निरीक्षणशक्ती, शब्दांवरील पकड आणि लेखनाची रचना करण्यासाठी गरजेची ती कुसर – क्राफ्ट – हे मिरासदारांकडे आहेत याचा पुरावा देणाऱ्याच या कथा. दुर्दैवाने मिरासदारांनी विनोदनिर्मिती करण्यासाठी अतिशयोक्ति, अतिरंजन हे साधन प्रामुख्याने निवडले; आणि म्हणून त्यांच्या कथा या तिखटामिठाच्या लाह्यांसारख्या तडतडीत झाल्या आहेत. खमंग, तोंडात असताना बऱ्या लागणाऱ्या, पण भूक फक्त चाळवणाऱ्या. मराठी वाचकाची भूक भागवण्याचे सामर्थ्य त्यांच्यात अभावानेच आढळते.

'मिरासदारी' या मिरासदारांच्या निवडक कथांच्या संग्रहात मिरासदारांच्या प्रतिभेची चुणूक दाखवून देणाऱ्या काही सुंदर कथाही आहेत. खेड्यातली शाळा या विषयावर मिरासदारांनी पुष्कळ कथा लिहिल्या आहेत. 'शिवाजीचे हस्ताक्षर', 'शाळेतील समारंभ', 'माझ्या बापाची पेंड', 'ड्रॉइंग मास्तरांचा तास' या त्यातल्या काही कथा. यातल्या काही कथांमधला नायक हा शाळेत जाणारा लहान मुलगा आहे; त्यामुळे त्याची जगाकडे बघण्याची दृष्टी सरळ, साफ आहे. आणि त्याच्या आसपासची मंडळी बाकी तयार, बेरकी आहेत. या विसंगतीमुळे काही विनोदी प्रकार घडतात. गावाकडची तऱ्हेवाईक मंडळी आणि त्यांच्या आयुष्यातील गमतीजमती यावर मिरासदरांनी लिहिलेल्या 'भुताचा जन्म', 'धडपडणारी मुले', 'व्यंकूची शिकवणी', 'नदीकाठचा प्रकार', 'निरोप', 'झोप' वगैरे कथाही माफक विनोदनिर्मिती करतात, पण त्या वाचताना नकळत (आणि तसे करणे योग्य नाही हे माहिती असूनही) अशा प्रसंगांवर व्यंकटेश माडगूळकरांनी केलेले अस्सल देशी आणि कसदार लिखाण आठवते. असे बरेवाईट करणे योग्य नव्हे, हे खरे, पण तशी तुलना होते खरी. पण मिरासदारांचे लिखाण इतके विपुल आहे, की त्यांच्या खरोखर दर्जेदार कथाही बऱ्याच आहेत. 'नव्व्याण्णवबादची एक सफर', 'कोणे एके

काळी' 'विरंगुळा', 'गवत', 'पाऊस', 'साक्षीदार'; 'स्पर्श' या प्रस्तुत संग्रहातील अशा काही कथा. (मिरासदारांच्या या संग्रहात नसलेल्या 'हुबेहूब' वगैरे इतर काही कथाही या निमित्ताने आठवतात.)

'नव्व्याण्णवबादची एक सफर' ही गावातल्या थापाड्या नाना घोडक्याची कथा. खेड्यातल्या रुक्ष, आशाहीन जीवनात गावकऱ्यांना नानाच्या थापांचाच विरंगुळा आहे. त्या लोणकढ्या आहेत हे जसे नानाला ठाऊक आहे, तसे गावकऱ्यांनाही. तरीही नाना तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी सांगतो आणि गावकरीही त्या ऐकून घेतात. आपले लग्न व्हावे ही सुप्त आशा ठेऊन असलेल्या नानाला एक देवऋषी खोटे बोलू नको, मग मार्गशीर्षापर्यंत तुझे लग्न होईल असे सांगतो. त्याप्रमाणे नाना त्याच्या अद्भुत कथा सांगणे बंद करतो. मग हळूहळू त्याची लोकप्रियताही ओसरते. रोजच्या, तुमच्या आमच्यासारख्या अळणी आयुष्यात कुणाला रस असणार? मार्गशीर्ष येतो आणि जातो, पण बिचाऱ्या नानाचे लग्न काही होत नाही. जिवाला कंटाळलेला नाना जीव द्यायला पाण्यात उडी घेतो, पण गावकऱ्यांपैकी कुणीतरी त्याला वाचवते. भानावर आलेल्या नानाला ओळखीचे चेहरे दिसतात, त्याला सगळे आठवते, आणि आपल्या आयुष्यात आता हिरवळ येणार नाही हे पचवलेला नाना परत एक फर्मास गोष्ट सांगायला लागतो. मिरासदार लिहितात, '.. आणि मग संध्याकाळच्या त्या शांत, उदास वेळेला नानाच्या आयुष्याला पुन्हा एकदा अर्थ आला. तो गोष्ट सांगत राहिला, माणसे तन्मय होऊन ऐकत राहिली आणि ते रुक्ष, भकास वातावरण पुन्हा एकदा अद्भुततेने भरुन गेले.'

'कोणे एके काळी' ही मिरासदारांच्या पोतडीतून निघालेली एक वेगळी चीज आहे. एका राजाच्या पदरी असलेल्या एका सामान्य रुपाच्या पण बुद्धिमान विदूषकाची ही कथा मिरासदारांनी जुन्या, संस्कृतप्रचुर भाषेत लिहिली आहे. भाषेचा बाज राखण्यात थोडेसे कमी पडलेले मिरासदार कसदार कथानकाने ही कसर भरुन काढतात. प्रथमपुरुषी निवेदनात्मक शैलीने लिहिलेल्या या कथेत काही वाक्ये विलक्षण चटका लावणारी आहेत. 'अभिसाराला आलेली ती सुंदर चतुर तरुणी मोठ्या उत्कंठेने अंतर्गृहात गेली – माझ्या दृष्टीसमोरून गेली – आणि एखाद्या तपस्व्यासारखी शुष्क मुद्रा धारण करुन मी तेथेच उभा राहिलो. वज्रासारखे अंगावर पडणारे चांदणे मोठ्या धैर्याने सहन करीत एकटाच उभा राहिलो..'

'विरंगुळा' ही निर्विवादपणे मिरासदारांच्या सर्वश्रेष्ठ कथांपैकी एक ठरावी असे मला वाटते. कोर्टातल्या गरीब कारकुनाची ही कथा वाचकाला हळवी करणारी आहे. आयुष्यात कसलीच उमेद नसलेल्या तात्यांचा विरंगुळाही भेसूर, जगावेगळा आहे. कुणी मेले की त्याच्या मर्तिकाची व्यवस्था करण्यापासून त्याची महायात्रा संपवून येणे हाच तात्यांचा छंद आहे. त्यात एकदा गुंतले की एरवी गरीबीने, परिस्थितीने पिचलेले, गांजलेले तात्या उत्तेजित होतात, त्यांच्या अंगात काहीतरी वेगळे संचारते. मग तिथे त्यांच्या शब्दांना किंमत असते, त्यांना मान असतो, त्या जगात ते सांगतात आणि इतर सगळे ऐकतात… पण एकदा का ते सगळे आटोपले आणि तात्या घरी आले की परत डोळ्यांसमोर ते भीषण दारिद्र्य उभे राहाते. ते बकाल घर, घरातल्या कधी न संपणाऱ्या मागण्या आणि चार पैशाचा हट्ट पुरवला न गेलेली, आईच्या हातचा मार खाऊन, गालावर अश्रूंचे ओघळ घेऊन मुसमुसत झोपी गेलेली लहान मुले…

मिरासदारांच्या प्रतिभेविषयी जर कुणाला शंका येत असेल तर ती नि:संशयपणे नाहीशी करणारी त्यांची कथा म्हणजे 'स्पर्श'. ही कथा म्हणजे कधीकधी साहित्यिक आपल्या नैसर्गिक पिंडाला संपूर्ण छेद देणारे काही लिहून जातो, तसे आहे. अगदी सर्वमान्य उदाहरण द्यायचे तर 'नंदा प्रधान' सारखे. कुटुंबातल्या वृद्ध स्त्रीच्या निधनानंतर तिच्या दहाव्याला आलेले नातेवाईक, त्या स्त्रीच्या आठवणी, पुन्हा पुन्हा भरुन येणारे डोळे, पिंडाला न शिवता घिरट्या घालणारा कावळा, अस्वस्थ झालेले भटजी आणि या सगळ्यांतून काही भेदक अर्थ काढणारी मने. मध्यमवर्गीय, संस्कारजड, भाबडी मने. या सगळ्या वैराग्यवातावरणाबाबत मिरासदार काही जबरदस्त वाक्ये लिहून जातात. 'पिंड उन्हात चमकत होता. झाडावर कावळे उगीच बसून राहिले होते. एखादा मध्येच कावकाव करत होता. काही तरी गूढ, न कळणारे समोर उभे होते. एकदा


ते चित्र निरर्थक वाटत होते आणि मग त्यात फारच गहन तत्व भरलेले दिसत होते. मृत्यूची महानदी, काळेभोर अथांग पाणी, ऐलतीरावरची जिवंत माणसे आणि पैलतीरावरील धूसर वातावरण – सरळ साधा व्यवहार आणि अगम्य गोष्टी यांचे नाते जोडण्याची धडपड. यत्न आणि कर्मफळ यांचे लागेबांधे. उजेडातून अंधाराकडे पाहण्याची कोशिस... सुन्न मनात विचारांची मोहोळे उठत होती. असले काहीतरी जाणवत होते आणि तरी ते फार अस्पष्ट होते.'

असले लिहू शकणाऱ्या मिरासदारांनी विनोदी (म्हणून जे काही लिहिले आहे ते) साहित्य लिहिले नसते तरी चालले असते, असे वाटते. असल्या काही अरभाट आणि काही चिल्लर कथांचे 'मिरासदारी' हे पुस्तक माझ्या संग्रहात आहे.

मिरासदारी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
३६५ पृष्ठे
किंमत १०० रुपये

---

## माझे व्हीगन प्रयोग



मुग्धा मुळे

पँडेमिकमुळे मला फेसबुक आणि इन्स्टा बघायला बराच वेळ मिळायला लागला. फेसबुकवर योगा, एरोबिक्स, झुंबा इत्यादी करून चवळीच्या शेंगा झालेल्या बायका फोटो टाकू लागल्या. निरनिराळ्या डाएटचे पेव फुटले. मग मला पण वाटले की आपण पण थोडे वजन घटवूया.

मी बराच शोध घेतला की कमीतकमी व्यायाम करून व जास्तीस्त जास्त खाऊन वजन कसे कमी करावे. बरयाच डाएट्सबद्दल वाचले. हाय फॅट, लो फॅट, हाय प्रोटीन, कलिंगड, फळे, २ चमचे भात वगैरे. खूप गुगलले की फक्त कांदा भजी असे काही डाएट आहे का ते. पण गूगलला काही जमले नाही. शेवटी व्हीगन डाएट करायचे ठरवले. आणि घरी जाहीर केले.

सकाळच्या चहापासून परीक्षा सुरु झाली. ओटमिल्क आणून चहात घातले व घोट घेतला. ठरवून मिटक्या मारायचा अविर्भाव केला, कारण नवरा व सासू बारीक लक्ष ठेवून होते. खूप मेहनत करून बरेच दिवस डाएट पाळले. अगदी चिकन, फिशकडे काणाडोळा केला. आणि सासूबाई अचानक सुगरण झाल्या. दुधाचे छान छान पदार्थ बनवायला लागल्या. खीर, बासुंदी, कढी, बर्फी आणून ठेवायच्या आणि मग म्हणायच्या, "अग विसरलेच! तू व्हीगन, नाही का?"

अश्यातऱ्हेने एक महिना झाला आणि माझ्या नवऱ्याने 'मुंबईकर, पुणेकर अँड नागपूरकर' आणि 'खाद्ययात्रा' असे २ लेख असलेली पुस्तके online मागवली. माझी बुद्धी सांगत होती, की पुस्तके उघडू नकोस (कारण मी ती आधी वाचली आहेत), पण मन बोलले, अग वाचते आहेस, काही खात नाहीस. मग 'दिल पे कोई जोर नाही' ह्या हिशेबाने मी ती वाचायला घेतली. रोज माझ्या स्वप्नात नवनवीन खाद्यपदार्थ यायला लागले. सलग चार दिवस स्वप्नात रसमलाई आली आणि विश्वामित्रांची तपस्या भंग पावली. सुरुवातीला हळूच चहात दूध घातले आणि अमृततुल्य प्यायल्याचा भास झाला. हळूहळू मेनकेने कब्जा करावा तसे माझ्या मनाने बुद्धीला हरवून मला पूर्णतः पूर्वपदावर आणले.

# प्रभा



विदुला कोल्हटकर

'दादासाहेब गायकवाड दवाखान्यात दाखल'
'प्रकृती गंभीर तरी स्थिर डॉक्टरांनी दिला निर्वाळा'
'पुढील ४८ तास महत्त्वाचे'

झटपट बातम्यांमध्ये पार्श्वसंगीतासोबत एकेक वाक्य पडद्यावर आदळत होते. कल्पनाताईंनी प्रश्नार्थक नजरेने शिल्पाकडे पहिले.
"काय झालं कुणास ठाऊक. अर्थात कळेलच पुढच्या पाच मिनिटांत, अगदी माहिती नको असली तरी कळेल... ते केवळ लेखक म्हणून नाही पण एकंदरच या भागात प्रसिद्ध आहेत." शिल्पाच्या सांगण्यावर कल्पनाताईंनी मान डोलावली.

कल्पनाताई बऱ्याच वर्षांनी त्यांच्या फार्महाऊसवर राहायला आल्या होत्या. एरवी मुंबईला असताना एखाद्या दिवशी येऊन जात. या वेळी त्या मुद्दाम थोडे दिवस रहायचं ठरवून आल्या होत्या. शिल्पा देखरेखीसाठी फार्महाऊसवर यायची आणि कोणी राहायला आलं असेल तर घरातलं सगळं काम करायची. याच गावातली असल्याने तिला गावातली सगळी माहिती असायची.

वृत्तनिवेदकाने पुढची माहिती सांगायला सुरुवात केली "१५ दिवसांपूर्वीच दादासाहेबांचा सहस्रचंद्रदर्शन सोहळा साजरा झाला होता. अत्यंत शिस्तबद्ध, रोजचा व्यायाम, नियमित आहार, रोजच लेखन वाचन असा कोणालाही आदर्श वाटावा असा दिनक्रम असलेले दादासाहेब. काल दुपारी त्यांच्या राहत्या घरी जमिनीवर पडलेल्या अवस्थेत आढळले. सध्या त्यांची शुद्ध हरपली आहे. मात्र ते स्थानिक तज्ज्ञांच्या देखरेखीत आहेत."

"काल सहलीनिमित्त तुम्ही त्यांच्याच वाड्याला भेट द्यायला गेला होतात ना?" शिल्पाने विचारले.
"हो हो, कालच तर तिथे होतो आम्ही." कल्पनाताई म्हणाल्या.

बातमीदार आता थेट हॉस्पिटलच्या दारापाशी होता. "आता आपण ऐकूया दादासाहेबांचे धाकटे सुपुत्र संजयजींची प्रतिक्रिया." "काल नेहमीप्रमाणे जेवायच्या आधी त्यांचे लिखाणाचे काम चालू होते, किंवा असणार. ते वेळेचे पक्के आहेत. आणि नंतर जेवायला आले नाहीत म्हणून बघायला गेलो तर ते जमिनीवर पडलेल्या अवस्थेत आढळले. आता ते स्वतःच पडले का त्यांना पाडण्यात आलं कुणास ठाऊक!" आजूबाजूच्या लोकांच्या चेहऱ्यावर आश्चर्यचकित भाव दाखवायला कॅमेरा जरा रेंगाळला.

'दादासाहेब गायकवाड दवाखान्यात दाखल'
'कुटुंबीयांनी व्यक्त केला घातपाताचा संशय'

"झालं आता यांना चांगलच कोलीत मिळालं. आता आठवडाभर हेच चालू राहील." असं म्हणत शिल्पा चहा टाकायला स्वयंपाकघरात गेली आणि कल्पनाताई कालच्या सहलीच्या आठवणींत रमल्या.

गाडी थांबताच कल्पनाताई दार उघडून बाहेर पडल्या. त्यांच्या ग्रुपमधल्या बाकीच्या बायकाही एकेक करून गाडीतून बाहेर आल्या. वाड्याचा उंच आणि मजबूत दरवाजा पाहून त्यांना बर वाटलं. 'नाहीतर बाकीच्या किल्ल्यांची काय दुरवस्था झाली आहे' त्यांच्या मनात विचार आला. सगळ्याजणी बाहेर आल्यावर त्यांनी वाड्याकडे कूच केलं. त्यांनी आधीच वेळ ठरवलेली असल्याने त्यांच्या स्वागताला रायबा तयारच होता. आल्या आल्या त्यांचं स्वागत भीमाबाईने दिलेल्या

वाळ्याच्या छान सरबताने झालं. रायबा आणि भीमाबाई दोघांनी जुन्या काळाला साजेसे कपडे घातले होते. दोघांच्या पोशाखांनी आणि वाड्यावरच्या त्या वातावरणाने सगळ्याजणी एकदम अठराव्या शतकात गेल्या.

रायबा आणि भीमाबाई त्यांना एकेक दालन दाखवत, प्रत्येक दालनाची खासियत, तिथे कोणते कार्यक्रम, बैठका झाल्या, त्यांचे इतिहासातले स्थान, आणि त्यांचं कौतुक सांगत होते. दोघांना भरपूर माहिती होती आणि ती कशी सांगावी याचं कसबही होतं. सगळ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत देत त्यांची सफर चालू होती. तितक्यात वाड्याच्या सध्याच्या मालकांचा विषय सुरु झाला.
"आमचे मोठे मालक दादासाहेब वाड्याच्याच बाजूला राहतात. त्यांचा थोरला मुलगा म्हणजे आमचे थोरले मालक इथेच गावात असतात. त्यांचा धाकटा मुलगा म्हणजे धाकटे मालक दूर तिकडे दक्षिणेत होते बरीच वर्षं, पण मागच्या महिन्यात दादासाहेबांच्या सहस्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने बऱ्याच वर्षांनी का होईना पण इकडे परत आले. आता रोज संध्याकाळी येतात भेटायला," रायबा म्हणाला.
"हो ना, आमच्या मोठ्या मालकांचं आता वय झालंय. पंधरा दिवसापूर्वीच तर वाढदिवसाचा मोठा कार्यक्रम झाला!" भीमाबाईंनी मोठ्या अभिमानाने माहिती पुरवली.
"हो मी बघितलं बातम्यांमध्ये. दादासाहेब, त्यांचा मोठा मुलगा आणि मला वाटतं धाकटा मुलगा पण होता," सुनंदाताई म्हणाल्या. त्यावर आणखी तीन-चार जणींनी माना डोलावल्या.
"अं हो ना," जरासा चाचरत रायबा म्हणाला. मग सावरून म्हणाला "ते तिकडे दूर केरळला असतात. बऱ्याच वर्षांनी मोठ्या कार्यक्रमासाठी म्हणून मुद्दाम आले होते."
"तुला बरीच माहिती दिसते सगळ्याची," नीलिमाताई हसत हसत म्हणाल्या.
"हो पिढ्यानपिढ्या आम्ही या वाड्याचं काम बघतोय. मालकांच्या जितक्या पिढ्या इथे राहिल्या तितक्याच आमच्या पिढ्याही इथे सेवेत आहेत. मध्ये बरीच वर्षं वाड्याला उतरती कळा लागली होती. त्यावेळी मालकांनीच अनेक वर्षांपूर्वी दिलेल्या शेतीवर आमची गुजराण चालू होती. मी पण कॉलेजमध्ये इतिहासाचा विद्यार्थी आहे. आठवड्यातले ३-४ दिवस इथे काम करतो. लोकांना वाड्याची, इतिहासाची माहिती देतो. ही भीमाबाई किंवा खरंतर भाविनी पण माझ्याच कॉलेजमध्ये शिकते. मालकांनी वाड्याची डागडुजी करून परत सगळं पाहिल्यासारखं केलं. माझ्या आजाला फार बरं वाटलं." रायबाच्या स्वरातला आनंद आणि अभिमान लपत नव्हता. या दोघांना असणारी माहिती आणि ती सांगण्यातल्या उत्साहाचा जरा उलगडा झाल्यासारखे सगळ्यांना वाटले.

सगळे फिरत फिरत वाड्यातल्या गणपतीच्या देवळात आले. देव्हाऱ्यातली मूर्ती छोटीशीच, पण पाहून प्रसन्न वाटावी अशी होती. छान सुबक शेवंतीचा हार, जास्वदाचं लाल फूल आणि हिरवीगार दुर्वांची जुडी. बघताच आपोआप सगळ्यांनी हात जोडले. देऊळ छोटेखानी पण सुंदर होते. खिडक्या आणि झरोके असलेलं मध्यम आकाराचं गर्भगृह, दगडी चौथऱ्यावर सागवानी लाकडाचे कोरीव काम केलेले खांब आणि महिरप, काचेच्या हंड्या असलेला मंडप. कल्पनाताई देऊळ बघून अगदी खूश झाल्या. तेवढ्यात "नमस्कार, नमस्कार," म्हणत एक उंच-निंच बलदंड गृहस्थ मंडपात त्यांच्या घोळक्याकडेच येत होते.
"नमस्कार धाकटे मालक," म्हणत रायबा पुढे झाला.
"अरे तुला किती वेळा सांगितलं मालक वगैरे नको, फारतर संजय दादा म्हण," संजयदादा हसून म्हणाले. रायबाच्या चेहरा मात्र निर्विकारच होता.

संजय साधारण ५०-५५ वर्षांचा असेल, चांगला उंच आणि देखणा. चेहऱ्यावरची मग्रुरी मात्र शोभून दिसते असे नाईलाजाने का होईना म्हणायला लागावे. गेल्या २-३ आठवड्यात संजय एकदम प्रसिद्धीच्या झोतात होता. तो आल्याबरोबर आजूबाजूचे सगळे त्याच्याबरोबर सेल्फी काढून घेत होते. कल्पनाताई मात्र त्याच्याकडे बघत होत्या. 'हा दक्षिणेला गेला! म्हणजे खरतर मुंबईला चित्रपटात काम करायला निघून गेला असं म्हणाले असते लोक तर पटलं असतं. पण दक्षिणेला?'

इतक्यात संजयने सेल्फी काढताना मान वळवली आणि कानातली भिकबाळी एकदम चमकली. त्यातला लालबुंद माणिक आणि त्याची प्रभा संजयच्या कानशिलापाशी पडली होती. त्यातले मोती अगदी खुलून दिसत होते.
"तुमची भिकबाळी अगदी सुरेख आहे," कल्पनाताई पटकन म्हणाल्या.
"हो ना भिकबाळी नवीन असली तरी आमच्या राजघराण्यातले जुन्या काळातले अस्सल मोती आणि माणिक आहेत," संजयने तोऱ्यात सांगितलं. आणखी थोडे फोटो काढून झाल्यावर संजय देवळातून बाहेर पडून वाड्याच्या मागच्या बाजूला गेला. रायबाने हळूच मान कलती करून तिकडे बघितलं आणि चेहऱ्यावरचं प्रश्नचिन्ह पुसून टाकत "चला, आता आमचा जुना मुदपाकखाना बघू," म्हणत पुढे झाला. "नवीन किचन तिकडे मोठे मालक राहतात तिथे आहे, पण हे वाड्याचं जुनं वैभव!" भीमाबाईंनी माहिती पुरवली. मग पुढे खासगी दालनं, निवासस्थानं, तिथली बाग बघून सगळे परतीच्या वाटेला लागले.

जाता जाता परत एकदा ते गणपतीचे छोटेखानी देऊळ दिसले आणि सगळ्यांचे पाय तिकडे वळले. तिथे १०-१५ मिनिटे थांबून निघू असे सगळ्यांचे ठरले. मग काहीजणी सभामंडपातच बसल्या, नाही म्हटलं तरी बरंच चालणं झालं होतं. काही प्रसाधनगृहाकडे वळल्या, एक-दोन जणी मंदिराचं निरीक्षण करत होत्या. कल्पनाताई त्यातच होत्या. सागवानी लाकडावरचे कोरीव काम फारच सुरेख होतं. त्याचंच निरीक्षण करत होत्या. इतक्यात धापा टाकत संजय येताना दिसला. समोर कल्पनाताईंना बघून तो चमकला, पण त्याने पटकन त्याचे हुकुमी हास्य चेहऱ्यावर आणलं. "काय मग कसा काय वाटला  आमचा वाडा?" संजयने विचारलं. "फारच आवडला. विशेषतः आपल्या इथल्या बाकीच्या ऐतिहासिक वाड्यांची, किल्ल्यांची दुरवस्था बघता आणखीच छान वाटलं. असाच कायम टिकून राहू दे," कल्पनाताई मनापासून दाद देत म्हणाल्या. पण संजयचं लक्ष मात्र त्यांच्या बोलण्याकडे नव्हतं. त्याचा चेहरा पण आधीसारखा दिसत नव्हता. 'काहीतरी खटकतंय!' कल्पनाताई मनात म्हणाल्या. इतक्यात "चला चला निघूया, नाहीतर पोचायला उशीर होईल," असं म्हणत निर्मलाताई आल्या आणि सगळ्याजणी गाडीकडे जायला निघाल्या.

'काहीतरी खटकतंय...  पण काय?' उसासा टाकत कल्पनाताई मनातल्या मनात म्हणाल्या.
इतक्यात त्यांचा फोन वाजला आणि त्या वर्तमानात आल्या. "हां, बोल ग जयू, बरं, काय झालं सासऱ्यांना? आणि आता कसे आहेत? हो हो काही हरकत नाही. मी अजून आठवडाभर इथे आहे. दोन तीन दिवसांनी सुद्धा मला चालेल. तसे काही कार्यक्रम ठरले नाहीयेत आणि या खेपेला तुला भेटायचं ठरवूनच आले होते तर तू दोन तीन दिवसांनी कळवलंस तरी चालेल. फक्त मला तिकडे यायचं कसं ते बघावं लागेल. पण ते बघू. तुझ्या सासऱ्यांना बरं वाटू दे."

"काकू कोणाचा फोन होता?" म्हणत शिल्पा चहाचे कप घेऊन आली.
"अगं माझी ती शाळेतली मैत्रीण जयश्री पाटील, तिचा. सातवी ते दहावी मी आणि जयू एकाच बाकावर बसायचो. नंतर तिच्या वडलांची बदली नागपूरला झाली आणि तिचं पुढचं शिक्षण पण तिकडेच झालं. बरं, तेव्हा काही फोन नव्हते, त्यामुळे सुरुवातीला अधून-मधून पत्र पाठवायचो. मग ते पण थांबलं. २-३ वर्षांपूर्वी शाळेचा व्हाट्सअप ग्रुप तयार झाला तेव्हा परत सापडली. आता निदान मेसेज पाठवतो, पण त्यात भेटण्याची मजा नाही. मी रहायला इकडे येणार कळल्यावर मात्र आता भेटल्याशिवाय परत जायचं नाही असंच ठरवलंय. आमचं आज संध्याकाळी भेटायचं ठरलं होतं, पण तिच्या सासऱ्यांना दवाखान्यात ठेवलंय. त्यामुळे आजचा कार्यक्रम रद्द."
"काय झालं? आणि कुठल्या दवाखान्यात आहेत?"
"चक्कर येऊन पडले म्हणाली. तसं फारसं लागलं नाहीये, पण दवाखान्यात आहेत. कुठल्या ते विचारायचं मात्र राहिलं. तिने जरा घाईतच फोन ठेवला. करेन म्हणाली २-३ दिवसांनी."
"ठीक आहे. त्यांचा फोन आला आणि तुमचं ठरलं की सांगा".
आणि तो विषय तिथेच संपला.

दुसऱ्या दिवशी सकाळी कल्पनाताई पेपर वाचत होत्या. त्यात दादासाहेब गायकवाडांबद्दल माहिती आली होती. गायकवाड इथले राजे, खरंतर पूर्वापार वतनदार, पण मधल्या अनेक पिढ्या स्वतःला इथले राजे समजत. दादासाहेब इतिहासाचे हौशी अभ्यासक, लेखक, शिवाय नव्या तंत्रज्ञानाचे चाहते. पूर्वापार असलेल्या संपत्तीचा त्यांनी योग्य वापर करून गावात अनेक नवे कारखाने, नवे उद्योग सुरु केले. 'शिल्पा म्हणाली ते खरंच, इथल्या अनेकांना त्यांच्यामुळे रोजगार मिळाला असेल तर ते नक्कीच लोकप्रिय असणार.' काम काहीच नव्हतं, मग कल्पनाताईंनी टीव्ही चालू केला. गायकवाड वाडा परत बातम्यांत होता. 'दादासाहेबांच्या प्रकृतीत सुधारणा, मात्र अद्याप नक्की काय झालं ते कळलं नाही.' 'कुटुंबीयांनी व्यक्त केला घातपाताचा संशय.' 'अरे देवा हे आता किती दिवस चालू राहील? ... नवीन बातमी मिळेपर्यंत? नेहमीचंच झालंय हल्ली!' मनातल्या मनात म्हणत त्यांनी दुसरा चॅनल लावला.
'कोण आहेत संजय गायकवाड?'
'जाणून घ्या संजयजींची कथा'
'अरे देवा! इथे पण तेच!'
'संजय आणि त्याचा निघतानाचा चेहरा... काहीतरी खटकतंय ....' कल्पनाताईंना आठवलं.
"नमस्कार आम्ही तुम्हाला घेऊन आलो आहोत केरळ राज्यातल्या कत्तुर नावाच्या गावाला. केरळच्या राजघराण्यातील राणी गायत्रीबाईंच्या वंशज कावेरीबाई इथे राहतात. इथल्या मातृसत्ताक पद्धतीनुसार त्या राजघराण्यातील पुढच्या राणीसाहेब आहेत. दादासाहेब गायकवाडांचे दुसरे पुत्र संजयजी कावेरीबाईंशी अठरा वर्षांपूर्वी विवाहबद्ध झाले. त्यांचे चिरंजीव अक्षय, कावेरीबाई आणि संजयजी याच गावात राहतात. तर आता जाणून घेऊया या गावाबद्दल."
'अरे देवा कुठे चाललंय हे सगळं? आता उद्या या गावातल्या प्रसिद्ध चहावाल्याबद्दल जाणून घेऊ या म्हणून त्याच्याशी गप्पा मारायचा प्रयत्न करतील. कठीण आहे!' असं म्हणत कल्पनाताईंनी टीव्ही बंद केला. 'राजघराणं आणि राणीसाहेबांचं हे आकर्षण जगभरातच आहे म्हणायचं. पण आता मातृसत्ताक पद्धतीत या संजयच्या मुलाला काही राजा म्हणवून घेता येणार नाही,' असं मनातल्या मनात म्हणत कल्पनाताई पेपरमधल्या अग्रलेखाकडे वळल्या.

दादासाहेब गायकवाडांच्या बातम्या येतच होत्या. प्रकृती स्थिर, प्रकृतीत सुधारणा, अखेर दोन दिवसांनी शुद्धीवर आल्याची बातमी आली. "वा वा! दादासाहेब बरे होऊ दे आणि आतातरी या बातम्यांपासून सुटका होऊ दे," शिल्पा हसून म्हणाली. इतक्यात टीव्हीवर पुन्हा संजयचा चेहरा झळकला. "दादासाहेब शुद्धीवर आले आहेत. माझी अद्याप भेट झाली नाही, पण डॉक्टर म्हणाले त्यांना २-३ दिवसात घरी जाता येईल. ही सारी भवानीमातेची कृपा!" संजय म्हणाला. 'याच्या चेहऱ्यावर काळजी दिसते आहे का? पण दादासाहेब तर आता बरे आहेत म्हणतोय, का काहीतरी नीट सांगत नाहीये? अरे देवा, बातम्या पुन्हा सुरु व्हायच्या!' कल्पनाताईंच्या मनात आलं.

दोन दिवसांनी जयूचा फोन आला. "अगं आज तुला वेळ आहे ना? मी तुला घ्यायला येते."
इतक्या वर्षांनी जयूची भेट होणार म्हणून कल्पनाताई खूष झाल्या. बरोबर १० वाजता जयूचा "मी बाहेर आहे, तयार असशील तर ये पटकन" म्हणून फोन आला आणि कल्पनाताई लगेच निघाल्या. जयू बाहेरच उभी होती. कल्पनाताई बाहेर पडल्यापडल्या "अगं किती वर्षांनी!" म्हणत दोघी हातात हात गुंफून मनापासून हसल्या. जयूने तिच्या भल्यामोठ्या गाडीचे मागचे दार उघडले आणि चल निघूया म्हणाली. आत बसल्यावर ड्रायवरने "आता घरी जायचं आहे ना?" विचारल्यावर जयूने मानेनंच हो सांगितलं. "सासरे बरे आहेत. शुद्धीवर आलेत पण अजून बोलत नाहीयेत. पण आता काळजीच कारण नाही असं डॉक्टरांनी सांगितलं आहे. उद्या परवा घरी सोडतील. मग काही आपली भेट होणार नाही, म्हणून हे म्हणाले आजच बोलाव" जयूच्या पहिल्याच उत्तराने कल्पनाताईंना हलके वाटले. समोर गाडी सुरु झाली आणि मागे दोघींच्या गप्पा. मग सध्या काय चालू आहे, मुलं काय करतात, कुठे असतात, बाकी शाळेतल कुणी भेटलं होत का, वगैरे नेहमीच्या गप्पा चालू झाल्या. त्यातून कल्पनाताईंना त्यांची एक चूक लक्षात आली. आपल्या डोक्यात आणि

फोनमध्ये जरी ही जयश्री पाटील असली तरी आता ती जयश्री गायकवाड आहे! आणि तिचे सासरे म्हणजे दादासाहेब गायकवाड!

गप्पांचा पहिला पूर ओसरेपर्यंत घर आलंच. बंगला प्रशस्त होता. आत आल्यावर कल्पनाताईंनी विचारलं, "काय गं, पण दादासाहेब पडले कशाने? काही त्रास होता का? आणि तुझ्या दिराने तर पडले का पाडण्यात आलं असा नवा सस्पेन्स तयार केला." "हो ना, सध्या तो एक ताप झालाय डोक्याला. दादांना अजून बोलता येत नाहीये. तिथे कॅमेरे आहेत पण इतरत्र होत तसं नेमक्यावेळी वीज नसल्याने कोणी आलं होत का कळत नाहीये. लोक काय दहा तोंडानी दहा गोष्टी बोलतात!" जयू म्हणाली. "अगं आम्हीपण त्याच दिवशी तिथे होतो. तुझे दीर, संजय, ते भेटले होते." कल्पनाताईंनी सांगितलं. "हं . आज पण भेट होईलच परत तुझी. दोन- तीन दिवसातच निघणार आहेत ते त्यांच्या खोलीत राजा रविवर्मानी काढलेल्या चित्राची कॉपी आहे ती आमच्या जाऊबाईंना भेट म्हणून द्यायची आहे. ती घ्यायला यायचे आहेत." जयूने माहिती पुरवली. मग पुढे राजघराणं, संजयच त्याबद्दलच आकर्षण, त्यावरून आधुनिक विचारांच्या दादासाहेबांशी उडालेले खटके, मग रागावून नाहीसा झालेला संजय, पुढे त्याचा केरळमधल्या कावेरीबाईंबरोबर झालेला विवाह, अशी बरीच माहिती जयूने सांगितली. "किती दिवस मनात होत हे सगळं, पण इथे कुणाशी या विषयावर बोलायची चोरी. त्यातून भावोजींनी तयार केलेला सस्पेन्स आणि त्याची डोकेदुखी. आता नवाच ताप आहे. पोलिसांना सांगावं का तपास करायला? दादांना नीट बोलता यायला लागलं तर प्रश्न लवकर सुटेल. तुझ्याशी सगळं बोलून बरं वाटलं बघ!"

गप्पा चालूच होत्या. जेवायची तयारी होईपर्यंत दोघी बाग बघायला म्हणून बाहेर पडल्या. त्या बाहेर फिरत असतानाच संजय आला. आणि दोघींना बघून त्यांच्याशी बोलायला आला. "या भावोजी. ही माझी मैत्रीण कल्पना. मुंबईला असते आता. नुकतीच आपला वाडा बघायला गेली होती तेव्हा तिथे तुमची भेट झाली म्हणाली," जयूने एका दमात सांगून टाकलं. "अं, हो भेटल्या होत्या मला वाटतं, मोठा ग्रुप आला होता," संजय चाचरत म्हणाला आणि जायला निघाला. कल्पनाताई त्याच्याकडेच बघत होत्या 'काहीतरी खटकतंय...' त्या दिवसाची आठवण आल्यावर त्यांना आठवलं. इतक्यात वाऱ्याच्या झुळकीने झाडाची पानं हलून उन्हाचा कवडसा संजयच्या कानावर पडला आणि त्यातल्या माणकाची प्रभा कानापाशी पडली. 'भिकबाळी!' युरेका युरेका मोमेन्ट म्हणतात तो हाच!

संजय कधी जातोय आणि जयूशी कधी बोलते असं कल्पनाताईंना झालं. तो गेल्या गेल्या त्या म्हणाल्या "अगं हा संजय हाच त्यादिवशी दादासाहेबांना भेटायला आला होता. आल्यावर त्याने सगळ्यांबरोबर फोटो काढून घेतले आणि माझा अंदाज आहे तो दादासाहेबांना भेटायला गेला. तिथे नक्की काहीतरी झटापट झाली आणि त्यात दादासाहेब पडले. तू विचारशील कशावरून तर जाताना आम्ही परत भेटलो तर याची भिकबाळी वाकलेली होती. गालावर जरा काहीतरी लागलं आहे असं वाटत होतं आणि चेहऱ्यावर ताणही दिसत होता. त्यादिवशीच मला जाणवलं की काहीतरी खटकतंय, पण काय ते आत्ता लक्षात आलं. भिकबाळी. त्यातले मोती आणि माणिक इतके सुरेख आहेत की आल्याआल्या फोटोसेशन चालू होतं तेव्हा अगदी लक्ष वेधून घेत होती ती भिकबाळी. नंतर आम्ही निघताना भेट झाली तेव्हा वाकलेली होती पण आता परत नीट व्यवस्थित आहे."

पुढच्या आठवड्यात कल्पनाताई मुंबईला परतल्या आणि दोन दिवसातच जयूचा फोन आला. "तुझे आभार मानायला फोन केला. तू म्हणालीस ते सगळं तंतोतंत खरं निघालं. भावोजींचं राजघराण्याचं आकर्षण त्यावरून दादांशी झालेला वाद आणि झटापट. उगीचच काहीतरी बोलायचं म्हणून त्यांनीच तयार केलेला सस्पेन्स, सगळं कबूल केलं. आता राजा आणि राजघराणं या विषयावर पुन्हा बोलणार नाही असं वचन दिलं त्यांनी आणि आम्ही झाल्या प्रकरणावर पडदा टाकला. न्यूज चॅनलवाल्यांना काहीतरी नवी गोष्ट मिळाल्याने त्यांनी पण हा विषय सोडला. खरंच तुझ्या मदतीशिवाय हे झालं नसतं." आपली मदत झाल्याचं ऐकून कल्पनाताईंना बरं वाटलं आणि त्या खिडकीतून खाली काय आवाज येतोय ते बघायला गेल्या.



**बाळकृष्ण पाडळकर**
सध्या वास्तव्य ट्रॅाय, मिशिगन येथे. त्यांनी भाषांतरित केलेल्या ‘ओवीस्वरूप श्रीमद्भगवद्गीते’चा विडिओ
युट्युबवर उपलब्ध आहे–
www.youtube.com/channel/UCKDIFeXQt1KAEhZfuvR6OcQ

## देस–परदेस

सुवर्णपुरी हे गोदावरी नदीच्या काठी वसलेले एक लहान गाव. सुवर्णपुरीची लोकसंख्या केवळ चार हजार. गावात मुख्यत्वे करून  ब्राह्मण समाज असल्यामुळे वर्षभर धार्मिक विधी चालत. गोदावरीच्या काठावर एक अतिप्राचीन असे शंकराचे मंदिर असल्यामुळे गावात नेहमी भाविकांची वर्दळ असायची.  धार्मिक विधींसोबत श्राद्ध, अस्थिविसर्जन, अंत्यसंस्कार यासारखी क्रियाकर्मे करण्यासाठी लांबून लोक इथे येत. या परिसरातल्या लोकांची अशी दृढ श्रद्धा होती की “वृद्ध-गंगा“ गोदावरीमध्ये अस्थिविसर्जन केल्यास मोक्ष मिळतो. प्रभू रामचंद्र सीतेबरोबर वनवासात असतांना बराच काळ येथे थांबले अशी आख्यायिका आहे. शंकराचे अतिप्राचीन मंदिर कलिंग संस्कृतीचा उत्कृष्ट नमुना होते. सूर्योदयापूर्वीपासून मंदिरात पूजापाठ, आरती, स्तोत्रपठणाची फार जुनी प्रथा होती. मंदिरावर ध्वनिक्षेपक असल्यामुळे संपूर्ण सुवर्णपुरीमध्ये मंदिरातील विधी ऐकू येत असत.

अभाअण्णाचे घर मंदिरापासून हाकेच्या अंतरावर होते. मंदिरामध्ये घंटा वाजली की त्याच्या आवाजाने अभाअण्णा जागा होई, हे नित्याचेच होते. मात्र त्याची बायको अहिल्या त्याच्या खूप अगोदर  उठून घरात झाडझूड, सडा रांगोळी करीत असे. लहान आरती या दोघानंतर बऱ्याच वेळाने उठून बसे. अभाअण्णाचे रेल्वे लाइनच्या पलीकडे शेत होते. तो सकाळीच बायकोबरोबर लहान्या आरतीला घेऊन शेतावर जात असे. त्यामुळे अहिल्याला बरोबर दुपारचे खाण्यापिण्याचे घेऊनच निघावे लागे. आरती बरोबर असल्यामुळे तिच्यासाठीही दुपारच्या वेळी खायला चीज वस्तू घ्यावी लागे.

अभाअण्णाच्या या कार्यक्रमात सहसा  फरक पडत नसे. शेतात आरती एकतर  स्वतःच स्वतःशी खेळत बसे किंवा खेळाचा कंटाळा आला तर ती तिच्या आईबापाच्या मागे मागे शेतभर फिरत असे. संध्याकाळी घरी आल्यावर अभाअण्णा हात पाय धुतल्यानंतर न चुकता मंदिरात जाई. एखादे वेळी आरतीही त्याचे बरोबर मंदिरात जाई पण आरतीला घेऊन जाण्याचा अभाअण्णाला भारी कंटाळा येई. आरती बरोबर असल्यामुळे थोडे अंतर चालून जाण्यासाठी त्याला बराच वेळ लागे. आरतीला घेऊन मंदिरात जायचे म्हणजे अभाअण्णासाठी ती एक मोठी कंटाळवाणी बाब होती. आरती नेहमी मंदिरात जायला उत्सुक नसायची. मंदिरात गेल्यावर शेजारी राहणाऱ्या मंडळींबरोबर थोडा वेळ गप्पा मारल्यावर अभाअण्णाला बरे वाटे. अंधार पडायच्या आत तो घरी परत फिरे. दुसऱ्या दिवसाच्या शेतीकामाची थोडीफार तयारी झाल्यानंतर, जेवणखाण आटोपल्यानंतर अभाअण्णा देवाची दोनचार भजने म्हणत असे. त्यानंतर सगळे झोपी जात.

अभाअण्णाचे कुटुंब खाऊन पिऊन सुखी होते. गावात हे कुटुंब फार श्रीमंतही नव्हते आणि गरीबही नव्हते. शेताला गोदावरीचे पाणी मिळत असल्यामुळे अभाअण्णाला शेतीचे उत्पन्न भरपूर होत असे. तो वर्षभराचे धान्य साठवून ठेवून बाकीचे धान्य जवळच असलेल्या तालुक्याच्या ठिकाणी विकून टाकी. तसे शेतीचे उत्पन्न त्याच्याकरता भरपूर असल्यामुळे त्याला नातेवाईक अथवा शेजाऱ्या पाजार्यांच्या जास्त संपर्कात राहण्याची गरज नव्हती.

दरवर्षी शिवरात्रीला सुवर्णपुरीमध्ये यात्रा भरत असे. ही यात्रा चांगली आठ दिवस चाले. यात्रेच्यावेळी  अभाअण्णा, त्याची बायको शेतावर न जाता यात्रेमध्ये सामील होत. बहुतेक वेळा यात्रेत सामील होण्यासाठी अभाअण्णाकडे त्याचे नातेवाईक परगावातून येत. त्यामुळे अभाअण्णाला शेतावर जाणे शक्य होत नसे. आरतीही तिच्या घरी पाहुणे आल्यामुळे खुश

असायची. अहिल्याला वाटे एकदा का आरतीची शाळा सुरु झाली की मग तिला असे बाहेर भटकायला मिळणार नाही. त्यामुळे अहिल्या तिला तिच्या बापाबरोबर तालुक्याच्या ठिकाणीही पाठवी.

असेच एका उन्हाळ्यात शिवरात्रीच्या यात्रेकरता अभाअण्णाकडे त्याचे लांबचे नातेवाईक आले. आरतीला त्यामुळे आनंद झाला. रोज यात्रेत फिरणे, खाणेपिणे यामुळे आरतीची चंगळ झाली. आरती खुश होती. भर उन्हात ती पाहुण्यांबरोबर यात्रेत भटकत होती. उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे आईने तिला यात्रेत रोज रोज जाण्यास मज्जाव केला परंतु अभाअण्णाच्या आग्रहाखातर अहिल्याने तिला यात्रेत पाठवले. त्यादिवशी यात्रेत पाहुण्यांबरोबर आरती खूप भटकली. त्यांना घरी यायला संध्याकाळ झाली. बाहेर भरपूर खाल्यामुळे आरती न जेवताच आल्या आल्या झोपी गेली.

रात्री अहिल्याचा हात आरतीच्या अंगावर पडला आणि तिला आरती तापाने फणफणली असल्याचे जाणवले. तिने अभाअण्णाला उठवले. आरती खूप तापलेली पाहून अभाअण्णाही घाबरला. त्याने लगेचच थंड पाण्याच्या पट्ट्या तिच्या डोक्यावर ठेवायला सुरवात केली. बराच वेळ अभाअण्णा, अहिल्या आरतीच्या डोक्यावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवीत होते. सकाळ होईपर्यंत आरतीचा ताप उतरला नाही त्यामुळे अभाअण्णाने आरतीला दवाखान्यात नेण्याचा निर्णय घेतला. दवाखान्यात जातांना आरती डोळे उघडायला तयार नव्हती. अभाअण्णाने तिला अलगद आपल्या हातावर घेतले होते. दवाखान्यात डॉक्टरांनी आरतीला तपासले आणि अभाअण्णाला विचारून दोन इंजेक्शने दिली. आरती रडत होती तिची आई परोपरीने तिची समजूत घालीत होती परंतु छोट्या आरतीचे रडणे थांबत नव्हते.

अहिल्या दिवसभर आरती जवळ बसून होती. तिचा ताप उतरत नव्हता. मध्ये थोडा कमी झाल्यासारखा वाटला परंतु आरती पुन्हा तापाने फणफणली. अभाअण्णाला, अहिल्याला काळजी वाटू लागली. त्यांच्याकडे आलेल्या नातेवाईकांनाही अपराध्यासारखे वाटू लागले, त्यांना असे वाटले की आपण यात्रेकरता आलो म्हणूनच आरती बाहेर निघाली आणि आजारी पडली. त्यामुळे त्यांनी आपला गाशा गुंडाळला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ते आपल्या गावी निघून गेले. दोन दिवस ताप उतरला नाही तर आरतीला परत दवाखान्यात घेऊन या अश्या सूचना डॉक्टरांनी दिल्या होत्या त्यामुळे संध्याकाळी आरतीला दवाखान्यात नेणे भाग होते.

डॉक्टरांनी आरतीला तपासले अन अजून एक इंजेक्शन दिले. अभाअण्णाला रात्री बर्फाच्या पट्ट्या देखील ठेवायला डॉक्टरांनी सांगितले. अभाअण्णा बायकोला व आरतीला घरी सोडून धावतच यात्रेच्या ठिकाणी गेला, त्याने यात्रेत बर्फगोळा विकणाऱ्या हातगाडीवाल्याला गाठले आणि त्याच्याकडून भुश्यात गुंढाळलेला बर्फाचा भला मोठा खडा विकत घेतला. अभाअण्णा घरी येताच त्याने बर्फाच्या पट्ट्या आरतीच्या कपाळावर ठेवण्यास सुरवात केली. आरती ग्लानी आल्यामुळे डोळे उघडायच्या अवस्थेत नव्हती. ती अंथरुणावर निपचित पडून होती. अहिल्या संध्याकाळचा स्वयंपाक करीत होती, पण तिचे मन स्थिर नव्हते. ती सारखी आरतीला जवळ येऊन पाहत होती.

रात्र नवरा-बायकोने जागून काढली त्यांच्या डोळ्याला डोळा नव्हता. आरती धड झोपेतही नव्हती आणि धड जागीही नव्हती. ती सारखे कण्हत होती. त्यामुळे तिच्या आईला जास्त काळजी वाटू लागली. सकाळी सकाळी अभाअण्णाला डोळा लागला पण मंदिराची घंटा वाजल्याबरोबर त्याला जाग आली. अहिल्या अद्याप आरती जवळ बसून होती. अभाअण्णाला वाटले आज आरतीला जिल्हा हॉस्पिटलमध्ये नेलेच पाहिजे. त्याने अहिल्याजवळ त्याला काय वाटते ते बोलून दाखवले, ते आरतीने ऐकले आणि तो मोठ्याने ओरडली,"नाही!" अन गप्प झाली. अभाअण्णाला आरतीची अवस्था पाहवत नव्हती. तो सरळ उठला आणि डॉक्टरकडे गेला. डॉक्टरांची भेट घेऊन त्याने त्याला आरती विषयी वाटत असलेली चिंता डॉक्टरांना सांगितली. डॉक्टरही त्याच्या म्हणण्याला राजी झाले, पण त्यांनी अजून एक दिवस वाट पाहायला सांगितले. डॉक्टरांना याची कल्पना होती की आरती गोळ्या घेणार नाही तरीही त्यांनी अभाअण्णाला गोळ्या लिहीन दिल्या आणि पाण्यातून अथवा दुधातून त्या आरतीला देण्यास सांगितले. अभाअण्णा गोळ्या घेऊन घरी आला व त्याने आरतीला गोळ्या

पाण्यातून बारीक करून देण्याचा प्रयत्न केला पण एक घोट घेताच आरतीने गोळी असलेले पाणी थुंकून टाकले. यामुळे अभाअण्णाची चिंता वाढली.

अभाअण्णा, अहिल्याने सकाळी उठून जिल्हा हॉस्पिटलची वाट धरली. हॉस्पिटलमधे दाखल होताच डॉक्टरांनी आरतीला तपासले आणि आयसीयूमध्ये दाखल करून घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे अभाअण्णाची पाचावर धारण बसली. आरती कण्हत होती, तिच्या आईचा चेहरा मलूल झाला होता. तिच्या तोंडातून शब्द निघणे मुश्किल होते.
मुख्य डॉक्टर पुन्हा आले, त्यांनी आरतीला बराच वेळ तपासले. तिला दोन इंजेक्शनेही दिली आणि निघून गेले. नर्स आरतीच्या कपाळावर बर्फाच्या पट्ट्या ठेवीत होती. दुपार टळून गेल्यावर ताप थोडा कमी झाल्यासारखा वाटला, डॉक्टरांनीही त्याला दुजोरा दिला. संध्याकाळी ताप बराच कमी झाला होता. डॉक्टरांनी एक दिवसानंतर आरतीला सोडण्याचे सूतोवाच केले आणि ते निघून गेले.

दुसरे दिवशी आरतीने डोळे उघडले पण ती काही बोलण्याच्या अवस्थेत नव्हती. अभाअण्णाला वाटले कदाचित अशक्तपणामुळे आरती बोलत नसावी. आरती संध्याकाळी घरी परतणार होती. डॉक्टर आले, त्यांनी आरतीला तपासले. त्यावेळी अभाअण्णाने डॉक्टरांना सांगितले की आरती बोलण्याचा प्रयत्न करते पण तिच्या तोंडातून शब्द निघत नाही. डॉक्टरांनी त्यांच्याच हॉस्पिटलमधील दुसऱ्या डॉक्टरांना बोलावले. त्यांनी आरतीची तपासणी केली आणि मुख्य डॉक्टरांना बाजूला घेऊन इंग्रजी भाषेत काहीतरी सांगितले. मुख्य डॉक्टरांनी आरतीला डिस्चार्ज देण्याचे रहित केले आणि अभाअण्णाला “आपण सकाळी बोलू” एवढे सांगून निघून गेले.

अभाअण्णाची, अहिल्याची चिंता पुन्हा वाढली. रात्रभर थांबून डॉक्टर सकाळी काय सांगतात हे ऐकणे त्यांना भाग होते. दुसऱ्या दिवशी डॉक्टर सकाळीच हॉस्पिटलमध्ये आले आणि तडक आरतीच्या बेडजवळ गेले. त्यांनी अभाअण्णाला सांगितले की ताप भयंकर वाढल्यामुळे कदाचित आरतीला बोलता येत नसावे. तिचे उपचार या हॉस्पिटलमध्ये होणार नाहीत, त्याकरता त्यांना आरतीला घेऊन हैद्राबादला जावे लागेल. हे ऐकताच अभाअण्णाची, अहिल्याची बोबडी वळली, त्यांना काय करावे सुचेना. उपचारासाठी तातडीने हैद्राबादला जाणे आवश्यक होते. आरतीला अहिल्याजवळ सोडून अभाअण्णा सुवर्णपुरीला आला. त्याने बँकेतून पैसे काढले आणि पुन्हा जिल्ह्याच्या ठिकाणी परतला. दुसरे दिवशी आरतीला घेऊन अभाअण्णा, अहिल्या हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. दुपारी डॉक्टरांनी आरतीला तपासले आणि सांगितले की त्यांना बराच काळ आरतीवर उपचार करावे लागतील. दोन दिवस आरतीवर उपचार करून डॉक्टर त्यांना गावी जाण्यासाठी परवानगी देणार होते.

अजूनही बोलता न येणाऱ्या आरतीला घेऊन अभाअण्णा, अहिल्या सुवर्णपुरीला परतले. हैद्राबादच्या डॉक्टरांनी सुचविलेले औषधोपचार आणि तोंडाचे व्यायाम अभाअण्णाने आरतीकडून करून घ्यायला सुरवात केली. परंतु आरतीला अद्याप गुण येत नव्हता. एक महिना झाला तरी आरती बोलू शकत नव्हती. तिच्यावर अभाअण्णा, अहिल्या डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे उपचार करीत होते. एक दिवस अभाअण्णा तालुक्याच्या गावी जाऊन डॉक्टरांना भेटला आणि आरती केव्हा बरी होईल असे विचारले. डॉक्टरांचा चेहरा काळवंडला. ते म्हणाले, “आरतीला म्युटिझम नावाच्या व्याधीने ग्रासले आहे. मेंदूला इजा झाल्यामुळे माणसाची वाचा जाऊ शकते. फारच थोड्या केसेसमध्ये वाचा परत येऊन पेशंट पुन्हा बोलू शकतो. आरतीच्या बाबतीत सुदैवाने तसे घडो अशी मी ईश्वराकडे प्रार्थना करतो.” हे ऐकताच अभाअण्णाच्या डोळ्यांत टचकन पाणी आले. डॉक्टरांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला धीर दिला. अभाअण्णाचे पाय गळून गेले, तो अत्यंत दुःखी मनाने घरी परतला.

आरती आता बरीच सावरली होती, पण तिच्या तोंडून शब्द फुटण्याची क्रिया अजूनही घडत नव्हती. अहिल्याला आरतीकडे पाहून रडू कोसळत असे. असहाय्य आरती केवळ हावभाव करून तिला काय हवे-नको ते सांगे. बऱ्याच वेळा तिने केलेल्या

हावभावाचा चुकीचा अर्थ अहिल्या, अभाअण्णा लावीत, त्यामुळे बराच गोंधळ उडे. परंतु काही दिवसांनंतर दोघांनाही तिच्या खाणाखुणा समजायला लागल्या.

आरती आता बरीच मोठी झाली होती. तिला शाळेत प्रवेश मिळणे दुरापास्त झाले होते. शाळेतल्या मुख्याध्यापकांनी आरतीला नांदेडमधल्या मूकबधिर शाळेत पाठविण्याचा सल्ला अभाअण्णाला दिला. परंतु अहिल्या आरतीला तिच्यापासून लांब जाऊ द्यायला तयार नव्हती. आरती परावलंबी असल्यामुळे अहिल्याला तिची काळजी वाटत होती. त्यामुळे जरी अभाअण्णा आरतीला नांदेडला पाठविण्याच्या मनःस्थितीत होता तरी अहिल्याचा त्याला विरोध होता. या वाद-विवादात वर्ष निघून गेले. अहिल्या आपल्या म्हणण्यावर ठाम होती. अभाअण्णाची अहिल्यासमोर डाळ शिजेना. आरती मोठी होऊ लागली, तिला अक्षरओळख होणेही शक्य नव्हते. अभाअण्णाला आरतीच्या भवितव्याची मोठी काळजी वाटत होती. लिहिता वाचता न येणाऱ्या आरतीला आपले उर्वरित आयुष्य कसे घालवता येईल या चिंतेने अभाअण्णा खूप अस्वस्थ होत होता. त्याचे, अहिल्याचे या विषयावर रोज वादविवाद होऊ लागले. शेवटी एक दिवस अहिल्याने अभाअण्णाला आरतीला नांदेडला पाठविण्याचासाठी संमती दिली.

आरतीला घेऊन अभाअण्णा नांदेडच्या शाळेत गेला. त्याने आरतीला शाळेत प्रवेश मिळवून दिला. शाळेतच खाण्या-पिण्याची सोय असल्यामुळे अभाअण्णाला बरे वाटले. भावनांचा बांध आवरून अभाअण्णाने आरतीला निरोप दिला आणि तो पुन्हा सुवर्णपुरीला आला. अहिल्याने रडून रडून तिची अवस्था भयंकर करून ठेवली होती. अभाअण्णा आल्यावर ती थोडी सावरली. तिने आरतीच्या शाळेविषयी, राहण्याविषयी अनेक प्रश्न विचारून अभाअण्णाला बेजार केले, परंतु अभाअण्णाला अहिल्याचे मन कळत होते. त्याने डोके शांत ठेवून तिच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यामुळे अहिल्या बरीच शांत झाली.
एक बोलता न येण्याचे व्यंग सोडल्यास आरतीला अन्य काही अडचणी नव्हत्या. तिला खाणाखुणा करून तिच्या मैत्रिणींशी, शिक्षकांशी बोलावे लागे. शिक्षकांनीही तिला खाणाखुणांची शास्त्रोक्त पद्धती शिकवून तिचे इतरांशी होणारे संवाद सोपे केले. आरतीला नांदेडला येऊन वर्ष झाले होते. मध्यंतरी तिची आई तिला दोन वेळेस येऊन भेटून गेली होती. आरतीला तिच्या आईविषयी फार जिव्हाळा वाटे. परंतु दुर्दैवाने आईला ती आपल्या भावना बोलून दाखवू शकत नव्हती. बऱ्याच वेळा आरती डोळ्यातून अश्रू ढाळून भावनांना वाट करून देत असे. तिचे दुःख न सांगण्यासारखे होते. आरती आता बरीच मोठी झाली होती. ती फावल्या वेळात कधी शिक्षकांबरोबर, कधी मैत्रिणींबरोबर तर कधी एकटीच बाहेर पडत असे. शाळेपासून लांब जाण्याची परवानगी नसल्यामुळे ती शाळेच्या अवती-भोवतीच फिरे.

अभाअण्णाच्या एका दूरच्या नातेवाईकाने आग्रह केल्यामुळे येत्या काही दिवसात अभाअण्णाचे कुटुंब आणि त्याचे नातेवाईक पुष्करला भरणाऱ्या कार्तिक मेळ्याला जाण्याचे निश्चित करीत होते. अद्याप पुष्कर मेळ्याला जवळपास सहा महिन्यांचा अवधी होता. अभाअण्णाला वाटले तोपर्यंत शेतीची कामे उरकून घ्यावी म्हणजे यात्रेला गेल्यावर शेतीच्या कामांची काळजी नको. आरतीही तोपर्यंत सुट्टयांत येण्याची शक्यता होती. तिला सोबत घेऊन यात्रा करावी, यात्रा झाल्यावर आरती पुन्हा शाळेत जाऊ शकेल असा त्याने विचार केला. पुष्कर यात्रेसोबतच जोधपूरच्या अचलनाथ शिवालयाला जाण्याचा संकल्प अभाअण्णाने सोडला होता. शेतीची कामे शिल्लक राहू नये म्हणून अभाअण्णा, अहिल्या हल्ली सकाळीच लवकर उठून शेतावर जात आणि रात्री बरेच उशिरा घरी परतत.

अभाअण्णाने आरतीला घरी आणले. यात्रेला त्याच्या सोबत येणारे त्याचे नातेवाईक त्यांच्या पोराबाळांसह सुवर्णपुरीमध्ये येऊन दाखल झाले. दोन दिवसानंतर लहान मोठ्या आठ माणसांचा हा जथ्था यात्रेसाठी प्रस्थान ठेवणार होता. आरतीला नातेवाईकांमध्ये असलेली तिच्या बरोबरची जोडीदारीण भेटल्यामुळे आरती खुश होती. आरतीला आनंदी पाहून तिच्या आईला फार बरे वाटले.

दोन दिवसांचा प्रवास केल्यानंतर अभाअण्णा त्याच्या कुटुंबासह, नातेवाईकांसह पुष्करला पोहोचला. आरतीने आयुष्यात एवढी मोठी यात्रा पाहिली नव्हती. तिने पाहिलेल्या सुवर्णपुरीच्या यात्रेपेक्षा ही यात्रा कितीतरी मोठी होती. लहान मुलांना खेळण्याची, खाण्यापिण्याची, बागडण्याची, या यात्रेत चंगळ होती. अहिल्याने, अभाअण्णाने पवित्र तीर्थराज पुष्कर सरोवरात स्नान केले आणि जवळच असलेल्या ब्रम्हाच्या मंदिरात जाऊन अभिषेक केला. ठिकठिकाणी "अंडी, मांसभक्षण करण्यास मनाई आहे." अशा आशयाचे बोर्ड लावलेले त्याने पाहिले. पुष्कर सरोवराचे मनमोहक सौंदर्य पाहून सगळे खुश झाले. दुपारी पुन्हा एकदा सगळ्यांनी यात्रेत फेरफटका मारला आणि संध्याकाळचे जेवण उरकून मंडळी अजमेरला आली. अजमेरच्या अजमेर शरीफला चादर चढविण्याचा अभाअण्णाचा विचार होता, पण वेळेअभावी आणि जोधपूरला जाणारी रेल्वे पकडायची असल्यामुळे अभाअण्णाने नातेवाईकांसह अजमेर शरीफला धावती भेट देणे पसंत केले.

दुसरे दिवशी सकाळीच जोधपूरच्या स्टेशनवर सगळ्यांनी अंघोळी आटोपल्या आणि जोधपूरच्या प्रसिद्ध अचलनाथ मंदिराकडे कूच केले. शिवालयातल्या भव्य शिवलिंगाला पूजा अर्पण केली. मंदिरात बराच वेळ घालवल्यानंतर मंदिरातल्या अल्पदरातल्या जेवणाचा सगळ्यांनी लाभ घेतला. अभाअण्णा शिवभक्त होता, त्याला अचलनाथ शिवालय फार आवडले. शिवालय अतिभव्य होते. सोळाव्या शतकात त्याची निर्मिती झाली असे तेथील पुजाऱ्याने सांगितले. जवळच्या तीन चार किलोमीटर अंतरावरील कुंजबिहारी मंदिराला जाण्याचा सल्ला पुजाऱ्याने त्यांना दिला. कुंजबिहारी अर्थात घनःश्याम मंदिरही खूप मोठे होते. संत मीराबाईचा पूर्णाकृती पुतळा मंदिराच्या दर्शनी भागात आणि त्या पुतळ्यासमोर घनःश्याम अर्थात कृष्णाची पूर्णाकृती मूर्ती विराजमान होती. संत मीराबाईच्या पुतळ्या शेजारी संत नामदेवाचा अर्धपुतळा भाविकांचे लक्ष वेधून घेत होता.

दिवसभर बरीच पायपीट झाल्यामुळे सगळे थकले होते.अजून एक दिवस जोधपूरमधील प्रेक्षणीय स्थळे पाहून मंडळी सुवर्णपुरीला परतणार होती. सुवर्णपुरीला जाण्याकरता मंडळी जोधपूरच्या 'भगत की कोठी ' या रेल्वे स्टेशनवर आले. अनेक पर्यटन स्थळांना भेटी दिल्यामुळे सगळेच थकले होते. कैंव्हा एकदा गाडी फलाटावर लागते अन आपण अंग टाकतो असे सगळ्यांना झाले होते. थोड्याच वेळात गाडी फलाटावर लागली. अभाअण्णाकडे रिझर्वेशन नव्हते, त्यांनी जनरल बोगी गाठली आणि आपल्या बरोबर असणाऱ्यांना डब्यात बसायला सांगितले. गाडी फलाटावर लागता लागताच अभाअण्णासह सगळे डब्यात चढल्यामुळे जागा व्यवस्थित मिळाली. दिवसभराच्या धावपळीमुळे आरतीसकट लहान मंडळी बसल्या जागेवरच पेंगू लागली. मोठी माणसे सुस्तावली होती. त्यांनी बसल्या जागीच डोळे मिटले. अहिल्याने आरतीला बाकड्यावर झोपवले आणि ती स्वतःही पेंगू लागली. गाडीत गर्दी झाली. गाडी सुटायला थोडा अवकाश होता. शेजारच्या प्रवाशाने अभाअण्णाला विचारले, "कहाँ जाना हैं?" अभाअण्णा म्हणाला, "आंध्रा". प्रश्न विचारणारा प्रवासी चमकून म्हणाला,"यह ट्रेन आंध्रा नही जायेगी, आंध्रा जानेवाली ट्रेन प्लॅटफॉर्म दो पर लगी हैं, और ट्रेन छुटनेका समय हो गया हैं" हे ऐकताच अभाअण्णाची त्रेधा उडाली. लगबगीने त्याने, त्याच्या बायकोने, नातेवाईकांनी आपआपले सामान उचलले आणि पटापट गाडीतून उतरून दोन नंबरच्या प्लॅटफॉर्मकडे धाव घेतली. गाडीत चढण्यापूर्वी अभाअण्णाने एकाला विचारले, "यह ट्रेन काचीगुडा जायेगी?" त्या गृहस्थाने तोंडाने न बोलता होकारार्थी मान हलवली. अभाअण्णा, त्याच्या बरोबर असलेले नातेवाईक डब्यात शिरले. डबा गच्च भरला होता. कोणालाही बसायला जागा मिळाली नाही. सगळ्यांना कसेबसे सामान लावून उभे राहावे लागले आणि गाडी हलली.गाडी हले पर्यंत अभाअण्णाला किंवा अहिल्याला आरती सोबत आहे किंवा नाही याचे भान राहिले नव्हते. जवळपास अर्ध्या तासाने अहिल्याला आरती आपल्या जवळ नसल्याची जाणीव झाली. तिने अभाअण्णाला ओरडून विचारले, "आरती कुठे आहे?" या प्रश्नामुळे अभाअण्णा दचकला आणि अवती भोवती पाहू लागला, परंतु आरती कुठेही दिसेना. त्याने ओरडून आरतीला आवाज दिला परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. या दरम्यान अहिल्याला अचानक आठवण झाली, तिने झोपलेल्या आरतीला आपल्या सोबत घेतलेच नव्हते. आरतीला सोडून सगळे प्लॅटफॉर्म दोन कडे धावले. अहिल्याला वाटले अभाअण्णाच्या हाताशी आरती आहे आणि इथेच गफलत झाली. गाडीत चढताच गाडी सुरु झाली.

अभाअण्णाने गाडीची साखळी ओढली परंतु गाडी थांबण्याचे नाव घेईना. त्याने पुन्हा साखळी ओढली. गाडीचा वेग कमी झाला आणि थोड्या अंतरावर जाऊन गाडी थांबली. अहिल्या आरतीच्या नावाने टाहो फोडीत होती. गाडी पूर्णपणे थांबताच गार्ड डब्याजवळ आला, त्याने घुश्यातच विचारले, "चेन किसने खेचा?" गार्ड समोर येताच अभाअण्णाने त्याला आरती दुसऱ्या गाडीत राहिल्याचे सांगितले. गार्डच्या एकंदर परिस्थिती लक्ष्यात आली. त्याने अभाअण्णाला पुढच्या स्टेशनवर उतरून विरुद्ध बाजूला जाणारी गाडी पकडून जोधपूरला जाण्याचा सल्ला दिला. गार्डही जोधपूरच्या स्टेशन मास्तरला आरतीबाबत संदेश देणार होता. पुढचे स्टेशन येताच अभाअण्णा गार्ड दोघेही खाली उतरले. गार्डने जोधपूर स्टेशन मास्तरला आरती नावाची ८/१० वर्षाची मुलगी थार एक्सप्रेसमध्ये चुकून राहून गेली असल्याचे सांगून तिला ताब्यात घेण्याची विनंती केली. तिचे वडील जोधपूरला येणाऱ्या गाडीने येत आहेत हे सांगायला गार्ड विसरला नाही. जोधपूरकडे जाणारी गाडी बरीच उशिरा होती. थार एक्सप्रेस निघून जाण्यापूर्वी आरती गाडीच्या खाली उतरली तरच अभाअण्णाची तिची भेट होणार होती, अन्यथा नाही. स्टेशन मास्तर दयाळू होता. त्याने उलट दिशेने जाणाऱ्या एका थ्रू मालगाडीच्या गाडीच्या गार्डला थांबवून अभाअण्णाला जोधपूरला घेऊन जाण्याची विनंती केली. त्यामुळे अभाअण्णाला जोधपूरला लवकर पोहोचणे शक्य झाले. परंतु तो पोहोचेपर्यंत थार एक्सप्रेस कराचीकडे रवाना झाली होती. अभाअण्णाला जोधपूरला पोहोचण्यास तसा उशीरच झाला होता.

एव्हाना थार एक्सप्रेस भारतीय हद्द ओलांडून पाकिस्तानच्या हद्दीत शिरली होती. गाडीने झिरो पॉईंट स्टेशनही पार केले होते. झिरो पॉईंट रेल्वे स्टेशनवर तपासणीत पाकिस्तानी रेंजरला आरती गाडीच्या बाकावर बसलेली आढळली. त्यांनी तिच्याकडे कागदपत्रांची मागणी केली असता त्यांना काहीही प्रतिसाद मिळाला नाही. थोड्याच वेळात रेंजरच्या हे लक्ष्यात आले की त्या मुलीला बोलता येत नाही. ती खाणाखुणा करूनच संवाद साधू शकते. रेंजरने त्यांच्या कराची कॅन्टोमेंटच्या मुख्य कार्यालयात तिला नेण्याचे ठरवले. ते कराची स्टेशन येई पर्यंत तिच्या शेजारी बसून राहिले. आरती सारखी रडत होती. दोन दिवसांच्या दगदगीमुळे तिला पुन्हा ताप आला आणि ती आजारी झाली.

कराची स्टेशन येताच रेंजरनी आरतीला त्यांच्या कार्यालयात नेऊन अधिकाऱ्यांसमोर उभे केले . मध्यंतरीच्या काळात थेट जोधपूरच्या स्टेशन मास्तरचा संदेश आला. संदेशात त्यांनी नमूद केले की, "चुकून दहा वर्षांची मुलगी थार एक्सप्रेसमध्ये बसली आणि ती कदाचित कस्टम अधिकाऱ्याच्या हाती पडली असावी. मुलीजवळ कुठल्याही प्रकारची कागदपत्रे नाहीत आणि तिला बोलता येत नाही. तिला परत जोधपूरला रवाना करावे. "परंतु रेंजरने अथवा अधिकाऱ्यांनी जोधपूरच्या स्टेशन मास्तरच्या म्हणण्याला मान्यता दिली नाही. आरती आजारी झाल्यामुळे तिला दवाखान्यात भरती करण्यात आले.

काही दिवसानंतर आरतीला बरे वाटले. कराचीमध्ये असणाऱ्या अपंग मुलांकरता काम करणाऱ्या एका सामाजिक संस्थेच्या संचालकाला बोलावून अधिकाऱ्यांनी आरतीला त्यांच्या हवाली केले आणि तिला भारतात कसे पाठवता येईल हे पाहण्याकरता सांगितले.

या सिंधी सामाजिक संस्थेने सरकार दरबारी आरती विषयी माहिती कळविली आणि तिला मायदेशी पाठविण्याकरता सहकार्य करण्याची विनंती केली परंतु त्यात त्या संस्थेला यश आले नाही. आरती सामाजिक संस्थेच्या अनाथगृहात राहत होती. आज ना उद्या आपल्याला आपल्या आईबापाकडे जाता येईल अशी भोळी आशा आरती बाळगून होती. परंतु धकाधकीच्या दुनियेत तिचे दुःख समजून तिला हिरीरीने मदत करण्याची कोणालाही इच्छा नव्हती.

आरती हळूहळू नवीन वातावरणात स्वतःला गुंतवून घेत होती. जरी बोलण्यास असमर्थ असली तरी लहान मोठी कामे करण्यात आरती तरबेज झाली होती. सामाजिक संस्थेमध्ये तिचे मन रमत नव्हते. परंतु ती जाणार तरी कुठे? आरती आता बारा तेरा वर्षाची झाली होती. तिने एका महिला डॉक्टरशी ओळख वाढवून तिच्या दवाखान्यात काम करण्याची

तयारी दाखवली. परंतु आरती वयाने लहान असल्यामुळे डॉक्टर महिलेला तिला काम देणे योग्य वाटले नाही. त्याऐवजी डॉक्टरांच्या घरी असलेल्या दोन लहान मुलांकडे लक्ष देण्याची कामगिरी ती आरतीवर सोपवू शकत होती. तिने आरतीला आपल्या घरी बोलावून घेतले आणि दिवसभर लहान मुलांबरोबर खेळायचे काम दिले. आरतीला लहान मुलांचा लहानपणापासून लळा होता. तिने ते काम काम म्हणून न करता हौस म्हणू सुरु केले.

आरती पाहता पाहता बरीच मोठी झाली होती. ज्या डॉक्टर महिलेकडे ती राहत होती त्या महिलेला वाटले आता आपल्या मुलांना सांभाळण्याची गरज नाही, कारण दिवसभर ते शाळेत जातात. आरतीने दवाखान्यात नर्सच्या हाताखाली काम केल्यास नर्सला मदत होईल आणि आरतीलाही रुग्णांची सेवा करण्याची संधी मिळेल. आरतीने घरी राहण्याऐवजी दवाखान्यात जाणे सुरु केले. रुग्णांची सेवा करताना तिला बऱ्याच वेळा तिच्या आईची आठवण येई. अशा वेळी आरती एखाद्या कोपऱ्यात जाऊन अश्रूंना वाट मोकळी करून देई. डॉक्टर महिलेला आरतीच्या या भावना समजत होत्या. डॉक्टरांनीसुद्धा सरकार दरबारी पत्रे पाठवून आरतीला मायदेशी पाठविण्याविषयी कार्यवाही करण्याची विनंती केली, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.

आरतीची परवड संपत नव्हती. वय वाढत होते. वाढत्या वयाबरोबर स्त्रियांना तोंड द्याव्या लागणाऱ्या अडचणीतून आरतीलाही जावे लागत होते. परंतु मन मोकळे करून सांगणार तरी कोणाला? डॉक्टर महिलेलाही अडचणी सांगण्याची मर्यादा होती. डॉक्टर महिला तिची आई नव्हत्या. आईजवळ मन मोकळे करणे वेगळे आणि परस्त्रीजवळ आपल्या अडचणी सांगणे वेगळे. आरती जरी मुकी होती तरी तिला स्त्रीसुलभ गोष्टींची जाणीव होती.

इकडे अभाअण्णा, अहिल्याने आरतीची आशा सोडली होती. आरतीची त्यांची ताटातूट होऊन बराच काळ लोटला होता. अभाअण्णाला आरतीचा शोध कसा ध्यावा याची माहितीही कोणाकडून मिळत नव्हती. आरती कुठे असेल, ती काय करीत असेल, ती या जगात तरी असेल का? असे विचार अहिल्याच्या मनात येऊन ती नाराज होई. तिच्या मनाची ही अवस्था कित्येक तास टिकून राही. मग तिला काही कामधंदा सुचत नसे. अभाअण्णा एकदा शेतात कामाला लागला की तो तहान भूक विसरत असे. त्याला आरतीची आठवण येत नव्हती असे नाही, पण केवळ आठवण येऊन आरती येणार नव्हती हे त्याला माहित होते.

आरतीच्या कामावर डॉक्टर खुश होती. परंतु आरतीकडे पाहून डॉक्टरांनाही अस्वस्थ वाटे. एक दिवस डॉक्टर महिलेला राजधानीत कुठल्याश्या परिसंवादाकरता जाण्याचा योग्य आला. राजधानीत तिचे अनेक मित्र होते, त्यापैकी काही निष्णात डॉक्टर तर काही प्रख्यात वकील होते. त्यापैकी एका जवळच्या वकील मित्राला भेटून तिने आरतीला तिच्या मायदेशी कसे पाठवता येईल याची चौकशी केली. वकील मित्राने पुढाकार घेऊन स्वतः भारतातल्या राजदूताला पत्र लिहिले. काही दिवसातच चौकशीची चक्रे फिरू लागली. कराचीस्थित डॉक्टरांना पत्र मिळाले की आरतीला मायदेशी पाठविण्यासाठी लवकरच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. या घटनेलाही सहा महिने उलटून गेले परंतु अद्याप आरतीच्या मायदेशी जाण्याविषयी काहीही झाले नाही. एक दिवस अचानक राजधानीतून पत्र आले आणि आरतीचे भाग्य उजळले. तिला भारतीय दूतावासाकडून बोलावणे आले होते. लवकरच तिला मायदेशी पाठविण्यासाठीची कार्यवाही होणार होती.

सर्व सोपस्कारांनंतर आरतीला भारतात रवाना करण्यात आले. तब्बल पंधरा सोळा वर्षानंतर आरतीचे पाय मायभूमीला लागले, परंतु आता नवीनच संकट उभे राहिले. आरती भारतात आली खरी पण तिच्या आई-बापाला शोधायचे कसे? मी मी म्हणणारे आईबाप खरोखरच तिचे आई बाप असतीलच कशावरून? तिचे खरेखुरे आईबाप शोधण्याची जबाबदारी एका सेवाभावी संस्थेने घेतली. अधिकाऱ्यांनी या संस्थेवर काम सोपवून आरतीचा दुवा घेतला. आरतीला अहिल्यामाता मिळेल तेव्हा मिळेल, आजतरी तिला विशाल हृदयाची कोट्यवधींना सामावून घेणारी भारत माता मिळाली होती.

सेवाभावी संस्था महाराष्ट्र , तेलंगणा प्रांतात आरतीच्या आईवडिलांचा शोध घेऊ लागली. परंतु अद्याप त्यांना त्यात यश येत नव्हते. यश येईल की नाही याचा अंदाज आज येऊ शकत नव्हता. आरतीच्या जीवनात अजून किती दिवस वनवास होता हे कोणी सांगू शकत नव्हते. तिला तिचे आईवडील भेटणार होते की नाही यावरच तिचे पुढील आयुष्य कसे जाणार हे अवलंबून होते. जर तिला तिच्या आईवडिलांचा आधार मिळाला नाही तर काय होणार ? आरतीचे उर्वरित आयुष्य असेच एकाकी हालापेष्टांमध्ये, कोणाच्या मायेची फुंकर न मिळता जाणार होते? या प्रश्नाचे उत्तर काळच देऊ शकणार होता.

## गणपती बाप्पा



**अथर्व बेंगेरी**
Grade 5, North Chevy Chase ES





बाल्टिमोर मराठी मंडळ
मैत्र

# चूल वर पिझ्झा



**सुनील खाडिलकर**

मराठी कला मंडळ व बाममं दरम्यान होणाऱ्या साहित्याची देवाणघेवाण उपक्रमाअंतर्गत हा लेख हितगुजच्या होळी २०२१ अंकातून घेतला आहे.

आजकाल करोनामुळे सर्वच गोष्टी व्हर्चुअल चालू आहेत. मध्ये मला थोडा ताप आला होता म्हणून डॉक्टरांना कॉल केला तर रिसेप्शनने व्हर्चुअल अपॉइंटमेंट घ्यायला सांगितले. वेबसाइट वर जाणे म्हणजे मोठं आव्हान होतं. हल्ली लॉग इन करणे जास्तच अवघड झाले आहे. मी रोबॉट नाही हे सिद्ध करण्यासाठी खूप परीक्षा दिल्या तरी ती साईट मला रोबॉटच समजत होती. आधी ट्रॅफिक लाइटची चित्रे खूप वेळा ओळखली. मग आले फायर हायड्रंट. मला कळत नाही की, जर रोबॉटिक सॉफ्टवेर सेल्फ ड्रायव्हिंग गाड्या चालविणार असेल तर रोबॉटला ट्रॅफिक लाईट किंवा फायर हायड्रंट दिसायला नको का? सर्वात शेवटी एकदम खराब हस्ताक्षरात लिहिलेला शब्द ओळखायला लावला. असो, बऱ्याच प्रयत्नानंतर ती वेबसाइट उघडली एकदाची!

माझ्या मेहनतीचे फळ की काय म्हणा, एका देखण्या नर्सचे चित्र समोर आले. पुढे लिहिले होते, "माझ्याशी बोलायचे असेल तर इथे दाबा", अजिबात दिरंगाई न करता मी बटण दाबले. "मी भेटते तुला थोड्या वेळात ... " असा मेसेज आला व तिची आतुरतेने वाट पाहत मी थांबलो. अंगात ताप असूनही कपडे ठीकठाक केले व चेहऱ्यावर थोडे उसने हास्य आणले.

थोड्याच वेळात खरी नर्स बाई स्क्रीनवर अवतरली व मला 'मैंने चाँद और सितारों की तमन्ना की थी' गाणे आठवले. पण माझ्या चेहऱ्यावरचे थिजलेले स्मित पाहून मी सिरीयस नाही हे कळल्यावर तिने मलाच माझे तपमान, वजन व रक्तदाब घ्यायला लावले व टायलेनॉल घे असे सांगितले. मलाही ताप तसा साधाच वाटत होता, तिने सांगितल्यावर खात्री झाली. व्हर्च्युअल विझिटमध्ये काही मजा नाही ते मात्र कळले.




दुपारच्या जेवणानंतर थोडी गुंगी आली होती तेवढ्यात दारावरची बेल वाजली. आत्ता काय कटकट असा विचार करीत दार उघडले तर दाराशी ३-४ मुलांचा घोळका. ती कुठल्यातरी कॉन्सर्टला जाण्यासाठी पैसे जमवीत होती. त्यांनी मला एक फ्लायर दिले, त्यावर 'चूल वर पिझ्झा' बघून आश्चर्य वाटले. कोणीतरी 'देशी' पैसे जमवीत असावा. त्यांना बहुधा 'येथे काही खपणार नाही' अशी अपेक्षा होती. त्यातच बायकोचे "काही घेऊ नका, फ्रिजमध्ये जागा नाही," असे मागून चालले होते.

खाली धगधगणारी शेगडी व त्यावर डोश्याच्या मोठ्या तव्यावर चीजमध्ये बुडबुडे येत आहेत असे पिझ्झाचे चित्र बघून तोंडाला पाणी सुटले. माझ्यातील 'दानशूर कर्ण' जागा झाला व मी त्यांना चक्क ४० डॉलर्स दिले. "जा बाळांनो, मनसोक्त गा, इटलीला जा, कॉन्सर्ट करा. मी इथे बसून गरमागरम पिझ्झा खातो," असे म्हणत दार लोटले. मुले उड्या मारत पुढच्या घरी गेली.

फ्लायर घेऊन सोफ्यावर बसलो तर समोरचा टीव्ही आपोआप सुरू झाला व त्यावर फ्लायरमधील तोच पिझ्झा तव्यावर दिसला. पिझ्झ्याभोवती चूल आणि वर असे शब्द गोलगोल फिरत होते. नंतर ते एकत्र आले 'वर-चूल', अरे म्हणजे ते चूलवर नव्हते तर वर-चूल (व्हर्चुअल) होते आणि आपण फसलो $४० देऊन. टीव्हीवर पिझ्झा कसा करायचा ते दाखवू लागले. म्हणजे तो पिझ्झा आपणच करायचा होता? कर्म माझं!

तेवढ्यात, मगाशी दाराशी आलेली मुले पण दिसू लागली TV वर! पिझ्झा तयार झाल्यावर त्यांनी मला एक स्लाईस आणून दिली. अचानक कोणीतरी माझे हात ओढू लागले आणि मला जाग आली. मला डुलकी लागली होती तर! समोर माझ्या नाती माझ्या हातात दिलेली खोट्या पिझ्झाची बशी परत मागत होत्या. त्यांच्या भातुकलीच्या किचन मध्ये खोटा-खोटा पिझ्झा बनवून त्यांनी मला दिला होता. तो ‘virtual ‘ पिझ्झा संपविल्यावर त्यांना बशी परत हवी होती व माझ्या नाती मला विचारत होत्या, “आबो, तुला आईस्क्रिम पाहिजे?”

एवढी चविष्ट ‘virtual’ स्लाईस खाल्ल्यानंतर मी आईस्क्रीम कसे नाकारणार? फक्त समोर काय येते याचा विचार करत होतो तेवढ्यात नात एका प्लेटमध्ये थोडी माती म्हणजे बहुधा आईस्क्रिम व गवताची पात म्हणजे टॉपिंग्स घेऊन आली. एकंदरीत virtual जग कसे असणार याची कल्पना मला येऊ लागली.

## एक अगम्य लालसा आणि पाच डॉलर्स




**मिलिंद पदकी**
न्यू जर्सीस्थित औषध वैज्ञानिक.
आता मेडिकल लेखक.
२०१७मध्ये मराठी काव्यसंग्रह
‘बदकनामा’ प्रसिद्ध
(ग्रंथाली, मुंबई).
मराठी आणि इंग्रजीतून
विज्ञानविषयक आणि ललित
लेखन. सध्या प्रामुख्याने
कोविडविषयक लेखनावर भर.

सूर्याचे ऊन्ह वाढत चालले होते. मॉल चमकत होता.
तिच्या डोळ्यातल्या प्रश्नाला मी म्हटले
"नाही बाई, (तुझ्या संमतीशिवाय)
मी ‘भलतेच काही’ करणार नाही." गर्दीच्या
कॉफी शॉपमध्ये नाहीतरी हा काय करू शकतो असा
विचार करून तिने होकार दिला. माझ्या
खिशातली लाल कवितांची डायरी तिला खुणावत असावी.
(युरोपातील श्रीमंत स्त्रिया
कवीचेही कॉफी -बिल स्वतःच देत!)
ऑफिसातून चालत चालत पलीकडच्या कॉफीशॉप कडे
आम्हा दोघांना जाताना पाहून
मोठा कुजबुजाट झाला.
मला येताना पाहून लिफ्टचे दारही उघडे न ठेवणाऱ्या
दुष्ट स्त्रियांबद्दलची माझी कविता
तिला विशेष आवडली. गाडीत बसताना तिने
रोचक कालव्ययासाठी माझे आभार मानले व
डोके खाजवीत घरी गेली.

हे पाच डॉलर्स वाया गेले किंवा कसे?
तुम्हीच सांगा!

# जरा विसावू या वळणावर – भाग १



**डॉ. जयश्री कुलकर्णी–खेरा**

भारतात नेत्ररोग तज्ज्ञ आणि सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञ म्हणून शासनात उच्च पदावर काम केले. वेगवेगळ्या पुरस्कारांनी सन्मानित. सध्या साइक्सविल, मेरीलँड येथे वास्तव्य. भटकंती, लिखाण, वाचन, संगीत, नृत्य, हेल्दी कुकिंगची आवड.

४०, ५०, ६० वर्षे ही अत्यंत महत्त्वाची वर्षे आहेत! आपल्याकडे चाळीशीला खूप महत्त्व दिले आहे. चाळीशीत खरे आयुष्य सुरू होते असेही म्हणतात. एका सुंदर आत्मनिर्भर आयुष्याची सुरुवात! या काळात व्यावसायिक जम बसलेला असतो. ताणतणावही भरपूर असतात. मुले शिक्षणात महत्त्वाच्या टप्प्यावर असतात. आई-वडील, सासू-सासरे यांच्या तब्येतींच्या तक्रारी वाढत चाललेल्या असतात. त्यातच आपल्यातही शारीरिक आणि मानसिक बदल झपाट्याने सुरु झालेले असतात. कित्येकदा खूप जण नैराश्याचे शिकार होतात. त्यासाठी वेळीच तयारीत राहिल्यास आयुष्य आश्चर्यचकित करणार नाही.

४० वर्षांनंतर होणारे शारीरिक बदल -
सर्वसाधारणपणे शरीराचा चयापचयाचा (metabolism) दर सुमारे १२ वर्षांनी २ टक्क्यांनी कमी होत जातो. त्यामुळे योग्य काळजी न घेतल्यास वजन वाढण्यास सुरवात होते. स्नायूंची घनता कमी होऊ लागते. जवळची आणि दूरची दृष्टी कमी होऊ लागते. यालाच चाळीशीचा चष्मा म्हणतात. ऐकण्याची क्षमता कमी होऊ लागते. डी जीवनसत्त्व आणि कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे अंगदुखी, दमल्यासारखे वाटणे, अशा तक्रारी सुरु होतात. स्त्रियांमध्ये रजोनिवृत्तीची लक्षणे (perimenopausal symptoms) दिसू लागतात. हॉट फ्लशेस, चिडचिड (irritable moods), अनियमित पाळी अश्या समस्या सुरु होतात. हाडांची घनता (बोन डेन्सिटी) वयाच्या पस्तिशीनंतर दर वर्षी एका टक्क्याने कमी होण्यास सुरुवात होते. अस्थिसच्छिद्रता (Osteoporosis) वाढते. शरीरातील संप्रेरकांमध्ये होणारे बदल (Hormonal changes), चुकीची जीवनपद्धती, यामुळे, थायरॉईड, मधुमेह, अतिरक्तदाब (high blood pressure), अतिकोलेस्टेरॉल (high cholesterol) सारख्या समस्या उद्भवू शकतात. मानसिक बदल सुरु होतात. यालाच मिडलाईफ क्रायसिस म्हणतात. झोपही कमी होऊ लागते. या बदलांना सामोरे जाण्यासाठी आपण तयार असले पाहिजे.

या तयारीसाठी एक छोटीशी योजना आखणी -
१. व्यायाम - दिवस थोडा लवकर सुरु करा. म्हणजेच जरा लवकर उठा. हा जास्तीचा वेळ स्वतःसाठी वापरा. जिम, चालणे, योगासने, ध्यानधारणा (मेडिटेशन), झुंबा, सायकलिंग यासाठी वापरा. दररोज कमीत कमी अर्धा तास व्यायाम जरूर करा. एरोबीक्स आणि शक्तिवर्धक व्यायामप्रकारांचा योजना आखणीमध्ये समावेश करा, म्हणजे स्नायूंचे वस्तुमान (muscle mass) योग्य राहील. आता सबबी नकोत. मानसिक आरोग्यासाठी ध्यानधारणा आवश्यक. शारीरिक लवचिकतेसाठी योगासने करा. सूर्यनमस्कार सर्वोत्तम!

२. आहार - दिवसाच्या सुरवातीला शक्तिदायी पौष्टिक नाश्ता करा. मोड आलेली कडधान्ये, फळे, अंडी, स्मूदी, सुकामेवा नक्की खा. शक्यतो तेलरहीत नाश्ता खा. यामुळे दिवसभराची ऊर्जा मिळेल आणि वजनही नियंत्रित राहील. आता अन्नाच्या बाबतीत जागरूक व्हा. घरी बनविलेले सकस अन्न खा. फास्टफूड, जंकफूड टाळा. मौसमी फळे, कॅल्शिअमयुक्त पदार्थ, प्रथिने, सॅलडस, वेगवेगळ्या बिया, तंतूमय (फायबरयुक्त) भाज्या, पौष्टिक सूप्स, दही, दूध यांचा जेवणात अवश्य समावेश करा. तळलेले पदार्थ टाळा. खूप भूक लागल्यावर खारट आणि तळलेले पदार्थ खाण्याकडे कल असतो, तो कटाक्षाने टाळा. खायला सुरुवात करण्यापूर्वी विचार करा! साखर आणि गोड पदार्थ प्रमाणात खा. आपल्या कौटुंबिक डॉक्टरांच्या सल्ल्याने जीवनसत्वे (व्हिटॅमिन्स), कॅल्शिअमच्या गोळ्या नक्की सुरु करा

३. झोप - कमीत कमी ७ ते ८ तासांची शांत झोप घेणे आवश्यक आहे. रात्री साडेनऊ-दहापर्यंत झोपण्याचा प्रयत्न करा. आता रात्रीच्या मित्रांबरोबरच्या अनावश्यक कार्यक्रमांना (social activities) पूर्णविराम! संध्याकाळी ४ नंतर कॅफिनचे सेवन टाळा. झोपण्यापूर्वी आवडती पुस्तके वाचायची सवय लावा.

४. समाजबंध (Social connections) - मित्रमैत्रीणींसाठी सुट्टीच्या दिवशी वेळ अवश्य काढा. त्यांच्याबरोबर खळखळून हसा. आठवड्याभराचा तणाव कमी करा. निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवा. स्वतःसाठी वेळ राखून ठेवा. हात पाय पसरून मजेत सिनेमे बघायलाही मुळीच हरकत नाही. आपले तणाव कमी करण्याच्या जागा शोधा.

५. बकेट लिस्ट - आता रोजनिशी (डायरी) लिहिण्याची सवय करा. त्यात छोट्या छोट्या नोंदी करणे, आपले विचार, अनुभव लिहून काढणे असे करू शकता. व्यक्त व्हायला शिका! आयुष्यात राहून गेलेल्या आणि आवर्जून करायच्या गोष्टींच्या नोंदी नक्की ठेवा, आणि त्या पूर्ण करण्यासाठी आग्रही व्हा.

६. विस्मरण - आता थोडे थोडे विस्मरण होणे सुरु होते. नावे पटकन आठवत नाहीत. वस्तू कुठे ठेवल्या ते पटकन आठवत नाही. तेव्हा मेंदू तरतरीत ठेवण्यासाठी एखादा नवा छंद जोपासा, नवी भाषा शिका. शब्दकोडे सोडवा. रोजनिशीत नोंदी ठेवा.

७. प्रार्थनाशक्ती - आपले श्रद्धास्थान निश्चित करा. प्रार्थनेची शक्ती अनुभवा.

८. रजोनिवृत्तीची लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे संवाद साधा!

९. सगळ्यात शेवटी महत्त्वाचे - आपल्या प्रत्येक वाढदिवसाच्या दिवशी आपली आरोग्यचाचणी (रुटीन हेल्थ चेकअप) आणि डोळे तपासून घ्यायला अजिबात विसरू नका. आणि हो, चाळीशीचा चष्मा स्मार्ट दिसतो बरं का! तेव्हा तो लावायला लाजू नका.

Prevention is always better than cure!

अशा तऱ्हेने छोट्या छोट्या पायऱ्या चढत आपण ही वर्षे खूप आत्मविश्वासाने अविस्मरणीय करू शकतो.

भले बुरे ते घडून गेले, विसरून जाऊ सारे क्षणभर,
जरा विसावू या वळणावर



# भेटी लागी जीवा



दीपा अनिल नातू

२०२० चे वर्ष कोरोनामुळे सगळ्यांनाच वाईट गेले होते. पण त्यातल्या त्यात वर्ष सरता सरता म्हणजे २९ डिसेंबर २०२० रोजी आमच्या पहिल्या वहिल्या नातवंडाच्या आगमनाची गोड वार्ता आम्हाला कळली आणि मन आनंदून गेले. हल्ली लगेच फोटो काढतात त्यामुळे आणि व्हिडिओ कॅालमुळे आम्हाला त्याला लगेच बघता आले.

आमचा मुलगा, सून आणि मुलगी सगळेच अमेरीकेत असतात. सुनेची आई नोव्हेंबर महिन्यात इकडे आली होती. आम्ही दररोज व्हिडिओ कॅालची आतुरतेने वाट बघत असायचो. झूमवरती सर्व आप्तेष्टांना बोलावून बाळाचे बारसे केले आणि *संविद* नांव ठेवले. नवीन तंत्रज्ञानामुळे हे सगळे सहज शक्य होत होते. रोज त्याच्या बाळलीला बघून खूप छान वाटायचे. ह्या वर्षभरात सगळेच 'वर्क फ्रॅाम होम' करत असल्याने बाळाकडे बघण्याच्या दृष्टीने खूप सोयीचे झाले.

बघता बघता संविद चार महिन्यांचा झाला. आधी ठरल्याप्रमाणेच सुनेची आई १९ मे पर्यंत राहू शकत होती आणि आम्ही १९ मे ला तिकडे पोहचणार होतो. तसे आमचे तिकीटही काढून झाले होते. कोविडची साथ वाढतच होती. भारतात लसीकरणाला जोरात सुरवात झाली होती. आम्ही पण इकडे यायचे म्हणून लगेचच लसीकरण करुन घेतले. एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आमचा दुसरा डोसही घेऊन झाला. जाण्याची सर्व तयारी पूर्ण होत आली. बॅगा भरुन झाल्या. आता मनाने तर आम्ही कधीच संविदकडे पोहोचलो होतो. पण आमच्या दुर्दैवाने ४ मे पासून अमेरीकेने भारतातील प्रवाशांना येण्याची बंदी जाहीर केली आणि आमच्या आनंदावर विरजण पडले.

आता बंदी कधी उठणार याची वाट बघणेच फक्त आमच्या हातात होते. रोज सकाळी उठल्यावर मी पहिल्यांदा बंदीविषयी काही बातमी आहे का बघत असे. पण काहीच घडत नव्हते. कोविडबाधितांचे प्रमाण हळूहळू कमी होत होते. आमचे नातेवाईक, मित्रमंडळी सगळेच सतत विचारपूस करत होते, काही बातमी कळली का यासंबधी. मुलाचीपण सारखी चौकशी चालू होतीच. असे करता करता ऑगस्ट महिना उजाडला. आम्ही सगळेच जण आता वाट बघून कंटाळलो होतो. तेवढ्यात एक आशेचा किरण दिसला.

अमेरीकेला भारतातून थेट येण्याची परवानगी नव्हती, पण भारताबाहेर १४ दिवस राहून अमेरीकेला जाणे शक्य होते. ज्या देशांवर बंदी नाही तिथे राहून जाता येत होते. अशा येऊ इच्छिणाऱ्यांचा एक गट होता, ज्यांच्याशी मुलाने संपर्क साधला आणि मग बरीच माहिती कळत गेली. सुनेच्या आईचा व्हिसाच्या मुदतवाढीसाठी अर्ज करुन झाला होता. त्यामुळे आम्ही जाईपर्यंत ती राहणार होती. मग शेवटी बरीच चर्चा करुन दोहामार्गे अमेरीकेत यायचे ठरले. पण दोहामध्ये आम्हाला १० दिवस विलगीकरणात रहावे लागणार होते. त्याचे पॅकेज दोहा विमानतळापासूनच सुरु होणार होते. विमानतळावरुन कॅबमधून थेट हॅाटेलमध्ये व तेथे दहा दिवस पूर्णपणे विलगीकरण. खोलीच्या बाहेर पडायचीही परवानगी नव्हती.

मुलगा, सून, मुलगी आणि आम्ही सर्वांनी विचाराअंती हाच पर्याय योग्य वाटतोय असा निर्णय घेतला आणि १६ ऑगस्टचे पुणे-दिल्ली-दोहा असे इंडिगो एअरलाईन्सचे तिकिट काढले. पुण्यातली आवराआवर करुन आम्ही एकदाचे आता निघणार होतो. टीव्हीवर वारंवार RT-PCR चाचणी करतानाच्या बातम्या बघितल्या होत्या. ते दृश्य बघून मला चाचणी करायची खूप भीती वाटत होती. पण नंतर एकूण चार वेळा ह्या चाचण्या आम्हाला कराव्या लागल्या. निघायच्या आधी ४८ तास चाचणी करुन अहवाल मिळाल्यावर तो अहवाल आणि हॅाटेल बुकिंग वगैरे बाकीची माहिती त्यांच्या 'Ehteraj App'वर

भरायची होती. नंतर त्यांच्याकडून मंजुरी मिळणार होती. ती सगळी माहिती भरुन झाली व त्यांची मंजुरीची ईमेलपण लगेच आली. एक टप्पा पूर्ण झाला होता.

पुण्याहून सर्व आवश्यक ती कागदपत्रे, RT-PCR चा निगेटिव्ह अहवाल घेऊन पुणे-दिल्ली प्रवास मास्क, प्लॅस्टिक शिल्ड व प्लॅस्टिक किट घालून पूर्ण केला. दिल्ली-दोहा विमानात मधली सीट मोकळीच ठेवलेली होती त्यामुळे तिथे किट घालावे लागले नाही. १६ तारखेलाच रात्री ११.३० वाजता आम्ही दोह्यात पोहोचलो. इमिग्रेशनचे सोपस्कार आटोपून कॅबमधून हॉटेलवर पोहोचायला आम्हाला पहाटेचे ३ वाजले. दोहा विमानतळावर सगळीकडे बरीच गर्दी होती आणि आमच्यासारखे बरेच भारतीय सहप्रवासीदेखील होते. पण विमानतळावरील कर्मचारी सर्वांना उत्तम मार्गदर्शन करत होते, त्यामुळे कोणतीच अडचण आली नाही.

आमचे हिल्टन हॉटेलमधे बुकिंग होते. योगायोगाने तिथली स्वागतकक्षातली मुलगी मुंबईची होती. मराठी बोलणारे कुणी भेटले म्हणून ती खूपच खूष झाली होती. तिथून १७ व्या मजल्यावर आम्ही १७ तारखेला पहाटे जे आत गेलो ते २७ तारखेला सकाळी ११ वाजता बाहेर आलो.

हॉटेलमध्ये जेवण उत्तम होते. सकाळी ७ वाजता भरपूर नाष्टा, १२ वाजता जेवण आणि परत संध्याकाळी ७ वाजता जेवण. खोलीच्या बाहेर बास्केट ठेवून बेल वाजवून जात असत. दार उघडून बास्केट आत घेऊन यायची आणि खाणे झाल्यावर बाहेर ठेवून द्यायची. तेवढ्यापुरतेच फक्त खोलीचे दार उघडले जायचे. नाष्टा व दोन्ही वेळचे जेवण एवढे भरपूर असायचे की ते उरायचेच. शिवाय ज्यूस, फळे, सूप, सॅलड हे पण असायचे.

आम्ही दोघांनी मनाची पूर्ण तयारी केली होती त्यामुळे ह्या दहा दिवसांच्या विजनवासाचा आम्हाला फार त्रास झाला नाही. सकाळी योगासने, खोलीतल्या खोलीत ४ किलोमीटर चालणे हे कधीच चुकविले नाही. वेगवेगळ्या विषयांवरची भाषणे यू ट्यूबवर आम्ही ऐकत होतो. १-२ मराठी मालिका, नातेवाईक आणि मैत्रिणींशी गप्पा, मुलांशी तर दररोज व्हिडीओ कॉल असायचाच.

पुण्याहून दोह्याला आलेले बरेच लोक होते. Whats app वर आमचा एकमेकांशी संपर्क होताच. त्यातल्याच एकांकडून कळले की आम्हाला तिकडचे मोबाईल सिम कार्ड घ्यावेच लागणार आहे. भारतात ज्याप्रमाणे आरोग्यसेतू ॲप आहे तसेच दोह्यामध्ये Ehteraj app चालते. जे आम्ही download केलेले होते पण आमच्याकडे सिमकार्ड नव्हते आणि हॉटेलमधून निघायच्या आदल्या दिवशीचा RT-PCR अहवाल त्या app वर येणार होता. दोह्यामध्ये कुठेही सार्वजनिक ठिकाणी गेल्यास तो अहवाल दाखवणे अनिवार्य होते त्या शिवाय कुठेच प्रवेश नव्हता. हॉटेलमध्ये चौकशी केली तर ते म्हणाले जवळच एक मोठा मॉल आहे तिथे सिमकार्ड मिळेल.

विलगीकरण संपल्यावर आमचे चार दिवसांकरिता दुसरे हॉटेल होते. मॅरियट एक्झेक्युटिव्ह अपार्टमेंटमध्ये आम्ही उरलेले चार दिवस राहणार होतो. २७ तारखेला दुपारी १२ च्या सुमारास आम्ही हिल्टनहून मॅरियटला जायला उबर नोंदवली. बाहेर नुसते भट्टीत आल्यासारखे वाटत होते. दोहामध्ये ४०-४२ डिग्री सेल्सियसच्या दरम्यान दिवसभर तापमान असायचे. संध्याकाळी ६.३० नंतर जरा कमी म्हणजे ३५-३८ च्या दरम्यान. हवा खूप दमात असल्यामुळे खूप घाम यायचा आणि थोडे बाहेर जाऊन चालून आले की एकदम थकल्यासारखे व्हायचे. याचा अनुभव आम्हाला नंतर चार दिवस आला.

मॅरियटमध्ये गेल्यावर रिसेप्शनवरच्या मुलीला सिम कार्ड बद्दल विचारले, तर तिने 'कशाला सिमकार्ड घेताय मी माझ्या मोबाईलवरुन तुम्हाला ॲप कनेक्ट करुन देते' असे म्हणत दोन मिनिटात सर्व करुन दिले. आमच्या मोबाईलवर आम्ही

निगेटिव्ह असल्याच्या अहवाल आणि हिरवा कंदील लगेच आला आणि आमचा एक मोठा प्रश्न झटक्यात सुटला. आता आम्हाला कुठेही जायला काही अडचण येणार नव्हती. त्या मुलीचे आम्ही विशेष आभार मानले.


मॅरियटमध्ये किचन अपार्टमेंट होते. त्यामुळे तिथे चहा, नाष्टा वगैरे आम्ही बनवत होतो. दोन्ही वेळेच जेवण बाहेरुन मागवत होतो. या पंधरा दिवसांच्या कालावधीत आम्ही बऱ्याच गोष्टी आत्मसात केल्या. तसे आम्ही दोघेही टेक्नोसॅव्ही होतो, पण पुण्यात कोथरुड सारख्या मध्यवर्ती भागात आमचे घर होते, जिथे बाहेर पाऊल टाकताक्षणी खाण्याचे विविध पर्याय, स्वतःचे वाहन वापरणे किंवा बस, रिक्षा या सगळ्या सुविधा होत्या. त्यामुळे ऑनलाईन खाणे मागवणे, उबर बुक करणे या गोष्टी फारशा कधी कराव्या लागल्या नव्हत्या. त्या आणि दोह्यामधली निरनिराळी ॲप डाऊनलोड करुन त्याचा लिलया वापर परदेशातही करायला आम्ही शिकलो. एरवी इकडे आल्यावर मुलंच सगळं करत असतात आपल्याला काही कराव लागत नाही.

बघता बघता चार दिवस संपले. परत एकदा RT-PCR टेस्ट केली. निगेटिव्ह अहवाल त्या ॲपमध्ये आलाच शिवाय लॅब मधून प्रिंटाऊट पण घेतली. सामान परत नीट बांधले आणि आता आमच्या 'फायनल डेस्टिनेशन'ला जाण्यासाठी आम्ही पूर्ण तयार होतो. सर्व कसोट्या पार करुन झाल्या होत्या. आता एकदा अमेरीकेत पोहचून इमिग्रेशन नीट पार पडले की केलेल्या सर्व कष्टांचे सार्थक होणार होते.

दोहा विमानतळावर थोडा बॅगांच्या वजनाचा प्रॉब्लेम आला त्या मुळे एका केबिन बॅगेमध्ये सामान बसवावे लागले आणि आम्ही अमेरीकेच्या प्रवासासाठी विमानात बसलो. १६ तासांचा प्रवास होता. बघता बघता तोही संपला. इमिग्रेशनच्या खिडकीत ह्यावेळी बरेच प्रश्न विचारले, पासपोर्टवर स्टॅम्प मारला आणि आम्हाला हायसे वाटले. बॅगा घेऊन बाहेर आलो. मुलगा आणि मुलगी दोघेही आम्हाला घ्यायला आले होते. त्यांना बघितल्यावर, भेटल्यावर सर्व शीण कुठल्याकुठे पळाला. अमेरीकेच्या या आगळ्या वेगळ्या प्रवासाची सांगता झाली.

घरी गेल्यावर ताजेतवाने होऊन संविदला प्रत्यक्ष बघितले आणि हातात घेतले तेंव्हा काय वाटले हे शब्दात सांगणे कठीण आहे. तरीही माझ्या भावना व्यक्त करते

भेटी लागी जीवा लागलीसे आस
संविद, तुला भेटण्यासाठी खास
केला सारा अट्टाहास
सोसला दहा दिवसांचा विजनवास
तुला पाहिले प्रत्यक्ष अन् घेतले कुशीत
काय वर्णू तो क्षण, न्हाऊन निघाले आनंदात!



भाग्यश्री साने

## मनातला गणपती

गणपती आणि गौरींचे दिवस म्हणजे आठवणींचा खजिना आणि प्रसन्न, मंगलमय दिवसांची सुरुवात. मराठी सणांमध्ये अतिशय महत्त्वाचे स्थान असलेला गणेशोत्सव लहान, थोर अश्या सगळ्यांनाच आपलासा वाटतो. माझ्या माहेरी एकत्र कुटुंब पद्धती. आमच्याकडे गणपती बसवण्याची प्रथा नव्हती, परंतु गौराई अतिशय थाटामाटात साजरी व्हायची. आजही गौरी-गणपतीचे दिवस म्हटले की मला आठवते ते म्हणजे आई, काकू यांनी मिळून केलेली घराची साफसफाई, फराळाचे वेगवेगळे पदार्थ, बाबा-काका यांनी मिळून केलेली घराची रंग-रंगोटी, आम्हा मुलांनी केलेली गौराईची सजावट, आजी-आजोबांची पूजेची तयारी, आजीने निगुतीने केलेले फुलांचे हार व देवीचे दागिने, गौराईंना चापून -चोपून साडी नेसवण्याचे आई-काकूंचे कसब, ज्येष्ठा कोण; कनिष्ठा कोण याची चर्चा, घरात दरवळणारा महाराष्ट्री पद्धतीच्या स्वयंपाकाचा घमघमाट, टाळ, चिपळ्या, झांजा वाजवून जोरजोरात म्हणलेली सकाळ-संध्याकाळची आरती, रोजच्या वेगळ्या रांगोळ्या आणि असंख्य माणसांची ये-जा. एवढे असूनही आम्हाला मुलांना कशाची कमतरता वाटत असेल तर ती गणपती बाप्पाची. बाबा म्हणायचे  'अगं, आपण कसब्यात राहतो ना !! म्हणुन कसबा गणपती हाच आपला घरचा गणपती !!' अशा तऱ्हेने पुण्यातला मानाचा पहिला गणपती हा माझा घरचा गणपती असे मी अभिमानाने सांगत असे. आता आठवले तरी हसू येते पण तेव्हा खरोखरच घरचा गणपती असल्यासारखे आम्ही दर्शनाला रोज जात असू. कसबा गणपती पासून अगदी २ मिनिटांच्या अंतरावर आमचा वाडा असल्याने या दिवसांमधली पुण्यातली धामधुम अजूनही कानात घुमत आहे.

लाऊडस्पीकर्सच्या भिंती आणि त्यावर वाजणारी सिनेमातली गाणी, मंडळांचे तऱ्हेतऱ्हेचे देखावे, ते बघण्यासाठी लागलेल्या लांबलचक रांगा, मंडळांच्या कार्यकर्त्यांची लगबग, रंगीबेरंगी वस्तू विकणारे फेरी-विक्रेते, खाण्या-पिण्याचे स्टॉल्स, फुलांचे सुवास, उदबत्त्यांचा सुगंध, गणपती अथर्वशीर्षाचे पठण अशा एक ना अनेक आठवणी आजही मनात तशाच ताज्या आहेत. तसे बघितले तर पुण्याचे गणपती आणि त्या दिवसातले वातावरण या विषयावर स्वतंत्र लेख होऊ शकतो. अजुनही हे दिवस आले कि वाटतं की पळत जाऊन आईने केलेला बेसनाचा लाडू तोंडात टाकावा. पण त्याच क्षणी डोळे खाडकन उघडतात आणि वर्तमानातले गणपती दिसायला लागतात आणि त्याच आईची जागा मी घेते.






माझ्या सासरी गौरी नसल्या तरी गणपती असतो. मूळ गणपती कोकणातल्या घरी बसवतात. तरी इथे मी मुलांसाठी प्रतिकात्मक हौसेचा गणपती बसवते. या वर्षी लहानपणीच्या आठवणींना उजाळा म्हणून भातुकली आणि आजीच्या साडीच्या उबेची आठवण करून देणारे खण कापड अशी मी थिम केली होती. भातुकलीच्या निमित्ताने मुलांना बंब, कळशी, विळी, गॅस सिलेंडर, दाणे पाखडायचे सुप, पिंप, फिरकीच्या झाकणांचे डबे, ठोक्यांची पातेली, मांडणी  अशा जुन्या घरातल्या अनेक गोष्टींची ओळख झाली. पुण्यातल्या एका ओळखीच्या काकूंना मदत म्हणून त्यांच्याकडून खणांचे तोरण, बैठक, उशांचे आभ्रे शिवून घेतले होते. त्या काकूंनी सुचवल्याप्रमाणे आपल्या भारतीय संस्कृती मधली सगळी शुभ चिन्हे - शंख, सरस्वती, कमळ, गोपद्म, गौराईची पावले, स्वस्तिक- अशी त्यावर रंगवून घेतली. बाप्पासाठी यावेळेस प्रसाद

म्हणून मी विड्याची पाने वापरून मोदक केले होते. त्याची कृती खाली देत आहे. नक्की करून बघा आणि मला कळवा कसे झाले ते.







हे सगळे ऐकून तुम्ही म्हणाल हौसेला मोल नसते हेच खरे. खरेच आहे ते. घरापासून इतके दूर राहून आपल्या संस्कृतीचा हात धरून ठेवायचा आणि मुलांना त्या संस्कृतीची ओळख करून द्यायचा हा एक छोटासा प्रयत्न. वयाने कितीही मोठे झालो तरी सणांच्या दिवसांमध्ये परत लहान व्हावेसे वाटते. मनाला माहेरची ओढ लागते आणि हातातल्या पणतीला आईने दिलेल्या तुळशीच्या कुंडीत एक छोटीशी जागा मिळते.

पानाचे मोदक:

पारीसाठी:

१ कप सुक्या खोबऱ्याची पावडर
२ विड्याची पाने
१ कप कंडेन्सड मिल्क
२ थेंब खाण्याचा हिरवा रंग

सारणासाठी:

गुलकंद
घरात असेल त्या सुकामेव्याची भरड पूड (बदाम, काजू, पिस्ता इत्यादि)
गुलाबाच्या सुक्या पाकळ्या



कृती:

एका भांड्यात सुक्या खोबऱ्याची पावडर घेऊन त्यात २ थेंब हिरवा रंग घालणे. विड्याची पाने देठे काढून बारीक चिरून घेऊन भांड्यात एकत्र करणे. या मिश्रणामध्ये थोडे थोडे कंडेन्स्ड मिल्क घालून हाताने एकत्र करणे. घट्ट गोळा तयार होईपर्यंत कंडेन्स्ड मिल्क घालत राहणे. दुसऱ्या भांड्यात गुलकंद, सुकामेव्याची भरड पूड आणि गुलाबाच्या पाकळ्या चुरडून एकत्र करून सारण तयार ठेवणे.

सर्वप्रथम मोदकाच्या साच्याला तूप लावून घेणे. बंद साच्यामध्ये खोबऱ्याच्या मिश्रणाचा छोटा गोळा घालून व्यवस्थित आकार देऊन घेणे. गुलकंदाच्या मिश्रणाचा छोटा गोळा साच्यात आत घालणे. वरून खोबऱ्याच्या मिश्रणाने मोदक बंद करणे. अलगद साचा उघडून मोदक बाहेर काढणे.

समस्या निवारण:

मोदक व्यवस्थित आकार घेत नसेल किंवा तुटत असेल तर कंडेन्सड मिल्कचे प्रमाण कमी-जास्त करा. पारीचे मिश्रण योग्य चिकट झाले कि मोदकाचा आकार व्यवस्थित येईल. प्रत्येक मोदकाच्या आधी साच्याला नव्याने तुपाचे बोट लावायला विसरू नका.

## उकडीचे मोदक



सविता शिंदे

नमस्कार मंडळी! मैत्रच्या अंकामध्ये मला पाककृती शेअर करण्याची संधी दिल्याबद्दल, सर्वप्रथम, मैत्रचे खूप खूप आभार. आज मी आपल्याला गणपती बाप्पाच्या आवडत्या मोदकांची पाककृती सांगणार आहे.

माझे नाव सौं सविता शिंदे. वास्तव्य, जर्मन टाऊन, मेरीलँड. भारतात, वसई कलाक्रीडा महोत्सव पाककृती स्पर्धेच्या, ३ वेगळ्या विभागांमध्ये सलग सात वर्षे प्रथम क्रमांक व आठव्या वर्षी परीक्षक म्हणून नेमणूक. 'इ टीव्ही मराठी'च्या मेजवानी व 'साम'च्या सुगरण ह्या कुकिंग शोमध्ये गेस्ट शेफ म्हणून आमंत्रित, अमेरिकेमध्ये सात्त्विक पदार्थांचे कुकिंग युटूब चॅनेल: व्हेजी गुडनेस (https://www.youtube.com/channel/UC2w4xeXdYr7MIzgiZYJve1w)

तशी मी मूळची सोलापूरची. त्यामुळे, लहानपणापासूनच सुक्या खोबऱ्याच्या मोदकांची सवय. मग ते गव्हाच्या पिठाचे तळणीचे असोत वा उकडीचे. दर महिन्याच्या चतुर्थीला आईला मदत करण्यासाठी आम्ही भावंडे वाट पाहात असू. आई, अनुपमा केत, मूळची सुगरण असल्याने तिने ते मोदक अगदी निगुतीने आम्हाला शिकविले. लग्नानंतर खरंतर तांदळाच्या उकडीच्या सुबक मोदकांची ओळख झाली. आमच्या शेजारच्या जोश्यांकडे तर दर गणपतीला पंक्तीत बसलेल्या सर्वांची मोदक खाण्याची जणू स्पर्धाच असे. ते ताटातले गरम गरम मोदक त्यावर साजूक तुपाची धार घालून, पोटाचा रस्ता कधी धरायचे, ते पोट तुडुंब भरेपर्यंत समजतच नसे. नवराही खवैय्या आणि लेकही तितकीच चवीचे खाणारी असल्याने, तळणीचे मोदक मागे पडून तांदळाच्या सुबक मोदकांनी दर चतुर्थीला आमच्या गणपती बाप्पाच्या नैवेद्यामध्ये जागा पटकावली!

साहित्य:

२ कप तांदळाचे (आंबेमोहर) पीठ
१ कप पाणी
१ कप दूध
१ कप कोल्हापुरी (केशरी) गूळ
२ कप खवलेला ओला नारळ
३ टेबल स्पून तूप
१ टेबल स्पून काजू, बदाम (प्रत्येकी)
१ टेबल स्पून खसखस
१/२ टी स्पून वेलची पूड
१/२ टी स्पून जायफळ पूड
२ केळीची पाने (किंवा मलमलचे कापड)
५-६ केशर काड्या (१ चमचा दुधात भिजवावे)

कृती:

१. सारण - एका फ्रायिंग पॅनमध्ये २ टेबल स्पून तुपामध्ये, काजू, बदाम, खसखस व खवलेला ओला नारळ घालून २ मिनिटे परतावे. त्यामध्ये किसलेला गूळ व दूध घालावे. सारण ओलसर होईल. ते मध्यम आचेवर हलवत राहावे. सारण सुके होत आल्यावर गॅस बंद करून जायफळ, वेलची पूड, व दुधामध्ये भिजवलेले केशर घालावे.
२. पीठ - एका भांड्यात दूध व पाणी एकत्र उकळल्यावर त्यामध्ये पीठ घालून ते न हलवता तसेच तरंगू देणे व गॅस बंद करणे. ७-८ मिनिटे तसेच ठेवून त्यानंतर पळीच्या दांड्याने ढवळून ५ मिनिटे झाकून ठेवणे. नंतर, पाणी लावून छान मळून घेणे.





३. छोटा गोळा घेऊन हाताने पिठाची पारी करून त्यामध्ये १ टेबलस्पून सारण भरून, पाकळ्या दुमडून मोदक करावा.



४. उकडीच्या भांड्यात, १ १/२ कप . पाणी घेऊन, त्यावर चाळणी ठेवावी. चाळणीवर मलमलचे कापड किंवा केळीचे पान ठेवावे. पानावर तुपाचा हात फिरवून त्यावर मोदक ठेवावे. वर झाकण ठेवून ५ मिनिटे मोठ्या आचेवर व नंतर मध्यम आचेवर १० मिनिटे ठेवावे. नंतर गॅस बंद करावा.
५. झाकण उघडून, हाताला पाणी लाऊन, एक एक मोदक, नाजूकपणे काढावा. तबकामध्ये छान रचून, त्यावर तुळशीचे पान ठेवून नेवैद्य दाखवावा.

हे झाले बाप्पाचे मोदक तयार!